गुरूवार
०५.१२.२०२४
किंमत २ रूपये
वर्ष २८ वे अंक २१३ पाने ६
R.N.I.No.MAHMAR./2001/10338
www.pritisangam.com

# प्रीतिसंगम







# प्रीतिसंगम


www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर








वर्ष २८ वे | अंक २१३ | पाने ६ | गुरुवार | दि. ५ डिसेंबर २०२४ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५


# मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीसच ;आज शपथविधी

## अजितदादा व एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री :शिंदे गृहखात्यावर ठाम:पंतप्रधानांसह १९ राज्याचे मुख्यमंत्री राहणार उपस्थित

**मुंबई/प्रतिनिधी:-**
देवेंद्र फडणवीस यांची भाजपच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली. त्यामुळेच तेच महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री होतील हे स्पष्ट झाले आहे. त्यांनी बुधवारी दुपारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्यासोबत राज्यपालांकडे सरकार स्थापन करण्याचा दावा सादर केला. त्यानंतर राज्यपालांनी त्यांना सरकार स्थापन करण्याचे औपचारिक निमंत्रण दिले. यावेळी भाजपचे निरीक्षक विजय रुपाणी व निर्मला सीतारामनही हजर होत्या.

आज दिवसभरामध्ये राजकीय घडामोडी घडत भाजपाच्या विधीमंडळ सदस्यांच्या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांची गटनेता म्हणून निवड करण्यात आली,त्यानंतर काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समवेत त्यांची व अजितदादांची एकत्रित वर्षावर बैठक पार पडली आणि तातडीने राज्यापालांकडे जावून पाठिंब्याचे पत्र सादर केले.

फडणवीस, शिंदे व पवार यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. त्यात फडणवीस व शिंदे या दोघांनीही सांगितले की, कोण व कितीजण शपथ घेतील याची माहिती लवकरच दिली जाईल. शपथविधी सोहळा गुरुवारी सायंकाळी ५.३० वा. आझाद मैदानावर होईल. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही उपस्थिती असेल.

महायुतीच्या पत्रकार परिषदेनंतर देवेंद्र फडणवीस वर्षा बंगल्यावर पोहोचले. येथे त्यांची एकनाथ शिंदे यांच्याशी ४५ मिनिटे चर्चा झाली.

सत्तास्थापनेचा दावा करण्यासाठी शिवसेनेचे एकनाथ शिंदे, भाजपचे देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादीचे नेते अजित पवार हे तिन्ही प्रमुख नेते एकाच गाडीतून राज भवनावर पोहचले . यावेळी देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे तीन नेते राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची भेट घेत राज्यात सत्तास्थापनेचा दावा केला. तर या शपथविधीसाठी इतर पक्षाचे अनेक दिग्गज नेते आणि प्रमुख ही हजेरी लावणार आहेत. यासाठी दिल्ली, मणीपूर, नागालँड आणि मेघालय राज्याचे प्रमुख आज मुंबईत येणार असल्याची माहिती पुढे आली आहे. महायुतीच्या शपथविधी समारंभात तिन्ही पक्षाचे राष्ट्रीय पातळीवर नेत्यांची हजेरी असणार आहे.



# अडीच वर्षांपूर्वी माझ्यासाठी फडणवीसांनी केली होती शिफारस

## एकनाथ शिंदे

**मुंबई/प्रतिनिधी:-**
आज आम्ही राज्यपाल महोदयांची भेट घेऊन महायुतीचे सरकार स्थापन करण्याची परवानगी मागितली. उदय आझाद मैदानात साडे पाच वाजता शपथविधी आहे. आम्ही तुम्हा सर्वांना आमंत्रित करतोय. इथेच मी मुख्यमंत्री व्हावे म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी अडीच वर्षांपूर्वी केली होती आणि आज ते मुख्यमंत्री व्हावेत म्हणून आम्ही शिवसेना पक्षाकडून केली आहे. असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.



महायुतीच्या नेत्यांनी आज मुंबईतील राजभवनात राज्यपालांकडेसत्ता स्थापनेसाठी दावा केला आहे. महायुतीकडून देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री करण्याची शिफारस करण्यात आली आहे. या सत्ता स्थापनेच्या दाव्यानंतर पत्रकार परिषदेत महायुतीच्या तिन्ही नेत्यांनी संवाद साधला. यावेळी एकनाथ शिंदे यांनी देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंद केले आहे तसेच पाठिंबा देखील दर्शवला आहे.

गावी गेलो तरी तुम्ही काय काय चालवत असता असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी मिश्किल टिप्पणी केली आहे. अगदी खेळीमेळीचे वातावरण महायुतीमध्ये आहे. प्रचंड बहुमताने महायुतीने विजय मिळवला आहे. लाडकी बहीण आणि सर्वसामान्य जनतेने यांच्यावर प्रचंड मतांचा वर्षाव केला. राज्य चालवताना अनेक निर्णय आम्ही घेतले, जे विकासकामे महाविकास आघाडीने थांबवले होते, आमचे सरकार आल्यावर आम्ही ते मार्गी लावले. सरकार सर्वसामान्यांसाठी असते आणि आम्ही ते तंतोतंत पालन करण्याचे आम्ही अडीच वर्ष प्रयत्न केले. सरकारच्या माध्यमातून एक आधार म्हणून आम्ही भूमिका पार पाडली, असे शिंदे म्हणाले.

एकनाथ शिंदे म्हणाले, डबल इंजिनचे सरकार आम्ही अडीच वर्ष चालवले आणि जनतेने आम्हाला पाठिंबा दिला. या निवडणुकीत सगळ्या एजन्सीचे अंदाज आम्ही बाद ठरवले. अडीच वर्ष आम्हाला देवेंद्र फडणवीस यांच्या अनुभवाचा फायदा झाला तसेच आता ते मुख्यमंत्री होणार आहेत त्याला आमचा पाठिंबा आहे. आम्ही फडणवीस मुख्यमंत्री व्हावेत म्हणून शिफारस केली. देवेंद्र फडणवीस यांचे मी मनापासून अभिनंदन करतो.

### मै रुकनेवाला नहीं ,शपथ घेणारच:अजितदादा

मुख्यमंत्र्यांसह तुम्हीही उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेणार का? असा प्रश्न एकनाथ शिंदे यांना पत्रकार परिषदेमध्ये विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना एकनाथ शिंदेंनी म्हटलं की, देवेंद्र फडणवीसांनी यावर भाष्य केलंय...संध्याकाळपर्यंत थांबा तुम्हाला सगळं कळेल. त्यावर अजित पवारांनी म्हटलं की, संध्याकाळपर्यंत त्यांचा समन्वय येईल, पर मैं तो रुकनेवाला नहीं, मी तर शपथ घेणारच आहे.. अजित पवारांच्या या वक्तव्यावर एकनाथ शिंदेंनी म्हटलं की, दादांना अनुभव आहे..सकाळी आणि संध्याकाळीही शपथ घेण्याचा... त्यानंतर पत्रकार परिषदेमध्ये एकच हास्यकल्लोळ झाला.

# उडतरे येथील जवान गुवाहाटीत शहीद



**सातारा/प्रतिनिधी:-**
उडतरे येथे जवान शहीद उडतरे ता. वाई येथील भारतीय सैन्य दलातील जवान प्रवीण रमेश बाबर वय ३८ हा आसाम गुवाहाटी येथे मृत्यू झाल्याचे व त्याला गोळया लागल्याचे प्राथमिक माहितीत सांगण्यात आले. शहीद जवान प्रवीण बाबर यांचे वडील ही सैन्य दलात होते तर प्रवीण हा कमांडो फोर्समध्ये होता. त्यांच्या पश्चात वृद्ध आई, पत्नी, दोन मुली एक मुलगा बंधू असा मोठा परिवार असून त्यांचे पार्थिव गुरुवारी सकाळी उडतरे येथे येईल, अशी माहिती उडतरे गावातील ग्रामस्थांनी दिली. शहीद जवान प्रवीण बाबर यांच्या लग्नाचा वाढदिवस मंगळवारी होता. बुधवारी त्यांच्या या बातमीने उडतरेसह संपुर्ण वाई तालुका हळहळला आहे.

## जुगार प्रकरणी एकावर कारवाई

**सातारा/प्रतिनिधी:-**
जुगार प्रकरणी एकावर शाहूपुरी पोलिसांनी कारवाई केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, शाहूपुरी पोलिसांनी जुना मोटर स्टॅन्ड येथे सादीक आयुब सय्यद (वय ४१, रा. गुरुवार पेठ, सातारा) याच्यावर जुगार प्रकरणी कारवाई केली. पोलिसांनी त्याच्याकडून २०१० रुपये व जुगाराचे साहित्य जप्त केले.

## गळफास घेवून युवकाची आत्महत्या

**सातारा/प्रतिनिधी:-**
गळफास घेवून एका युवकाने आत्महत्या केल्याची नोंद सातारा तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दरे खुर्द, ता.सातारा गावच्या हद्दीत करंजाच्या झाडाला शुभम बबन साळुंखे वय २३, रा. गडकरआळी, सातारा या युवकाने गळफास घेवून आत्महत्या केली. ही घटना दि. ३ डिसेंबर रोजी समोर आली. या घटनेची नोंद सातारा तालुका पोलीस ठाण्यात झाली आहे.

## फोन पे..

### (शपथ विधी)

दिल्लीतून फोनआला
कळले कसे लोकांला
बोलावे शपथविधीला
कसे असे या लेकाला
सर्वत्र हो हल्लागुल्ला
करतात मंत्री कुणाला
विरोधकी जळफळाट
वाव नाही हो गुणाला
घेऊन चला दिल्लीला
बायकोआलीलाडाला
भावआला कसा भला
हरब-यांच्या झाडाला
गर्दी केवढी भेटायला
जत्रेचेस्वरूप गल्लीला
आहे मी प्रसिद्ध किती
जरा सांगावे दिल्लीला
जेसिबी भरभरूनफुले
आणे कुणी सांडायला
आधी भेट आम्ही घेतो
लोकलागले भांडायला
जोर केवढा मिडीयाला
ब्रेकिंगबातम्या द्यायला
हमरीतुमरी कशी केली
मुलाखत मज घ्यायला
मिठाई सगळी सपाचट
रे लागले पेढे पाडायला
नाटकी काहीकलाकार
लागलेहमसून रडायला
आला होता फोन मला
फिरकू नका दिल्लीला
अप समज करून घेता
खरे सांगू कसे गल्लीला

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**



# झेडपीत बोगस प्रमाणपत्राद्वारे पदोन्नती

## रिपाईचे लक्षवेधी आंदोलन

**सातारा/प्रतिनिधी:-**
जिल्हा परिषदेत बोगस प्रमाणपत्राद्वारे पदोन्नती देण्यात आली असून याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनीही कारवाईचे आदेश दिले आहेत. पण, पुढे काहीच झाले नाही. त्यांच्या आदेशाला संबंधितांनी केराची टोपली दाखवल्यामुळे 'रिपाइं' गवई गटाच्यावतीने जिल्हा परिषदेसमोर लक्षवेधी आंदोलन करण्यात आले. यावेळी जोरदार घोषणाबाजीही करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. तर याबाबत 'रिपाइं'चे जिल्हाध्यक्ष संजय गाडे म्हणाले, जिल्हा परिषदेतील एका विभागात पदोन्नती करताना बोगस प्रमाणपत्रांचा वापर झालेला आहे. टायपिंग प्रमाणपत्रही बनावट आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी तीन महिन्यांपूर्वीच संबंधितांवर कारवाई करण्याचा आदेश दिला आहे. याबद्दल नागराजन यांचे अभिनंदन आहे. पण, तीन महिन्यानंतरही चुकीच्या पदोन्नतीबद्दल संबंधित विभागाकडून काहीच कारवाई झालेली नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणीही झालेली नाही. त्यामुळे जिल्हा परिषदसमोर लक्षवेधी आंदोलन करण्यात आले. आता एक महिन्यात संबंधितांवर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येणार आहे.

या आंदोलनात जिल्हाध्यक्ष संजय गाडे, युवा जिल्हाध्यक्ष विशाल कांबळे, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष आशुतोष वाघमोडे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# खा.उदयनराजेंच्या फोनने वाचला तरुणाचा जीव

## सातारच्या छत्रपतींच्या घराण्यातील व्यक्तीसाठी केली होती मंत्रीपदाची मागणी

**सातारा/प्रतिनिधी:-**
सातारा येथील शिवछत्रपतींच्या घराण्यातील व्यक्तीला मंत्रीपद द्यावे, अन्यथा वीजवाहक टॉवरवरुन उडी मारुन आपले जीवन संपवेन, अशी धमकी देणार्या होमगार्ड मध्ये जवान असणार्या एका तरुणाने आपला व्हिडिओ व्हायरल करीत एकच खळबळ उडवून दिली होती. त्यानंतर ही घटना खा. उदयनराजेंना समजताच त्यांनी संबंधित तरुणाशी मोबाईलवरुन संपर्क करुन त्याचे समुपदेशन करीत त्याला आत्महत्त्या करण्यापासून परावृत्त केले.

याबाबत माहिती अशी की, सदाशिव ढाकणे रा. राजूर गणपती, जि. जालना येथील होमगार्ड असणार्या तरुणाने आज सकाळी हसनाबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत असणार्या एका वीजवाहक टॉवर वर चढत सातारा येथील शिवछत्रपती घराण्यातील वंशजांना होऊ घातलेल्या मंत्रीमंडळाच्या विस्तारामध्ये कॅबिनेट मंत्रीपद द्यावे, चार तासांत याबाबतचा निर्णय मला कळवावा; अन्यथा मी या टॉवरवरुन उडी मारुन आपली जीवन संपवेन, असा व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित करीत संबंधित युवकाने खळबळ उडवून दिली होती. त्याला वाचविण्यासाठी पंचक्रोशीतील लोकांसह स्थानिक पोलीस ठाण्यातील अधिकारी-कर्मचारीही खाली जमून त्यांनी उडी मारु नकोस, अशा विनंत्या केल्या होत्या. परंतू तरीही तो आपल्या निर्णयापासून परावृत्त होत नसल्याचे लक्षात आल्यानंतर पोलिसांच्या मार्फत खा. उदयनराजेंपर्यंत हा सगळा प्रकार कळविण्यात आला. त्यानंतर खा. उदयनराजेंनी स्वत:च्या भ्रमणध्वनीवरुन संबंधित तरुणास फोन करुन त्याला उडी मारण्यापासून परावृत्त केले. यावेळी शिवछत्रपतींचे विचारही समजावून सांगितले. तसेच तुमच्यावर तुमच्या कुटूंबाची जबाबदारी आहे, याचीही जाणीव करुन दिली. तसेच येणार्या मंत्रीमंडळ विस्तारामध्ये सातारच्या राजघराण्यातील व्यक्तीचा निश्चितपणे समावेश केला जाईल, याचीही हमी दिली.

खा. उदयनराजेंच्या एका फोनमुळे आत्महत्त्या करणारा तरुण आपल्या निर्णयापासून परावृत्त झाला. संबंधित तरुणाची 'ती क्लीप' व्हायरल झाल्यानंतर तरुणाला समजून घालणारी खा. उदयनराजेंचीही क्लीपही मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे.

दरम्यान, मुंबईमध्ये भाजपच्या गटनेतेपदी तसेच महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांचे



नाव जाहीर झाल्यानंतर मंत्रीमंडळाचा विस्तार होणार असल्याने या मंत्रीमंडळामध्ये खा. उदयनराजे यांचे चुलतबंधू आ. शिवेंद्रराजे भोसले यांचाही समावेश होणार असल्याचे संकेत भाजप हायकमांडकडून दिले गेल्याने सातार्यामध्ये भाजपा तसेच दोन्ही राजेंच्या कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण झाले आहे.

# जिल्ह्यात कॅबिनेट मंत्रीपदाचा मान कोणाकोणाला ?

## शिवेंद्रसिंहराजे,शंभूराज देसाई,मकरंद आबा,जयकुमार गोरे यांच्या नावाची चर्चा

**सातारा/प्रतिनिधी:-**
विधिमंडळाच्या नेतेपदी भारतीय जनता पार्टीचे देवेंद्र फडणवीस यांची एकमताने निवड झाली. असून येत्या गुरुवारी आझाद मैदानावर मुख्यमंत्री पदाची ते शपथ घेणार आहेत .यामुळे सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग आला असून उद्याच्या शपथविधी मध्ये पहिल्यांदा सातारा जिल्ह्यातून कोण शपथ घेणार याविषयी चर्चा सुरू आहेत भाजपचे आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, शिंदे गटाचे आमदार शंभूराज देसाई, राष्ट्रवादी अजितदादा गटाचे आमदार मकरंद पाटील, आणि भारतीय जनता पार्टीचे जयकुमार गोरे ही चार नावे चर्चेत असून लाल दिव्याचा मान कोणाला मिळणार याविषयी जिल्ह्याच्या वर्तुळात प्रचंड राजकीय उत्सुकता आहे.

सातारा जिल्ह्यातून वरील चार आमदारांच्या मंत्री पदाची सुरू झालेली चर्चा थांबायला तयार नाही . यंदाच्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने सातारा जिल्ह्यातून महाविकास आघाडीचा सुपडा साफ करत आठ विधानसभा मतदारसंघात आमदारकीचा झेंडा रोवला आहे .आमदार जयकुमार गोरे यांची चौथी शंभूराज देसाई व आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची पाचवी टर्म सुरू झाली आहे .साताऱ्याने महायुतीला भरभरून दिले असल्यामुळे साहजिक मंत्रिपदाची चर्चा होणार हे उघड आहे साताऱ्यातून आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या नावासाठी स्वतः उदयनराजे भोसले यांनी दिल्ली व मुंबई येथे फिल्डिंग लावली आहे . त्यामुळे पहिल्या यादीत त्यांचे नाव असणार फक्त आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना कोणत्या खात्याचा कार्यभार दिला जाणार हे पाहणे महत्त्वाचे आहे शिंदे गटाचे आमदार शंभूराज देसाई यापूर्वी महाविकास आघाडीमध्ये माजी गृहराज्यमंत्री व नंतरच्या अडीच वर्षांमध्ये उत्पादन शुल्क मंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री सुद्धा होते त्यांना प्रशासनाचा अनुभव असल्यामुळे शिंदे गटाकडून त्यांची ही वर्णी लागणार यात शंका नाही.

महायुतीमध्ये २० १२ ९ असा मंत्रिपदांचा फॉर्म्युला ठरला आहे या फॉर्मुला मध्ये कोणत्या कोणत्या आमदारांना संधी मिळणार याविषयी कार्यकर्त्यांमध्ये चर्चा सुरू आहेत कराड दक्षिणचे आमदार अतुल भोसले यांनी काँग्रेसचा गड खालसा करत पृथ्वीराज चव्हाण यांचा पराभव केला तेथे भाजपला ताकद देण्यासाठी कदाचित अतुल भोसले यांच्याही नावाचा विचार केला जाऊ शकतो अशी चर्चा आहे .आमदार महेश शिंदे यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोरेगावच्या सभेमध्ये मंत्रीपदाचा शब्द दिला होता त्यामुळे त्यांचाही आग्रह पुढे येऊ शकतो .आमदार



जयकुमार गोरे यांनी गेल्या वीस वर्षापासून राष्ट्रवादीला कायमच माण तालुक्यात बॅकफूटवर ठेवले आहे त्यामुळे जिल्ह्याच्या पूर्व भागात भाजपची ताकद अबाधित राहण्यासाठी देवेंद्र फडणवीस नक्कीच त्यांचा विचार करणार अशी परिस्थिती आहे सातारा जिल्ह्यात कॅबिनेट पदाची माळ कोणाच्या काळात पडणार हा सर्वांसाठी महत्त्वाचा विषय आहे . भारतीय जनता पार्टी ही सीनियरिटीला मानते मात्र कदाचित यंदा कोणते वेगळे धक्का तंत्र अवलंबले जाणार याविषयी सुद्धा उत्सुकता आहे सातारा जिल्ह्यातील कॅबिनेट मंत्रीपदाचा विषय तसा तिन्ही घटक पक्षांसाठी महत्त्वाचा आहे पश्चिम महाराष्ट्रामध्ये सातारा जिल्ह्यात महायुतीची ताकत ठेवण्यासाठी या नावाचा विचार वरिष्ठ नेत्यांना करावाच लागणार आहे.

# 'देश का प्रकृती परीक्षण' अभियाना अंतर्गत अनंतराव पवार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत होणार विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**बारामती/प्रतिनिधी:**

'देश का प्रकृती परीक्षण' या मा. पंतप्रधान द्वारा घोषित व आयुष मंत्रालय भारत सरकार यांच्या निर्देशानुसार आयोजित राष्ट्रीय उपक्रमा अंतर्गत शुक्रवार दि.६ रोजी अनंतराव पवार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था माळेगाव मध्ये विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी होणार असल्याची माहिती संस्थेचे प्राचार्य मा.अवधूत जाधवर यांनी दिली.




तसेच याच दिवशी एचडीएफसी बँक व अनंतराव पवार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या वतीने संयुक्त रक्तदान शिबिर भरविण्यात आल्याचे देखील प्राचार्य जाधवर यांनी सांगितले या शिबिरामध्ये स्थानिक नागरिकांनीही भाग घेऊन मोठ्या प्रमाणावर रक्तदान करावे असे संस्थेच्या वतीने आव्हान करण्यात आले आहे.

दरम्यान या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेतील निदेशक, गटनिदेशक, कर्मचारी यांनी केले असून आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर हे संस्थेमधील कार्यशाळा क्रमांक तीन मध्ये होणार असल्याचे संस्थेचे गटनिदेशक सपकळ यांनी सांगितले.

# सायबर सुरक्षा क्षेत्रातील आव्हानांवरील उपायांसाठी सज्ज व्हावे

## मेजर जनरल केके चक्रवर्ती; 'एआयटी'मध्ये सायबर सुरक्षा व एथिकल हॅकिंगवरील प्रोग्रामचे उद्घाटन

**पुणे/प्रतिनिधी:**

डिजिटल युगामध्ये सायबर सुरक्षेचा प्रश्न अधिक व्यापक होत आहे. त्यामुळे सायबर सुरक्षा क्षेत्रातील नवनव्या आव्हानांवर मात करण्यासाठी उपाय शोधायला हवेत. त्यासाठी प्राध्यापकांनी अद्ययावत ज्ञान ग्रहण करीत सायबर सुरक्षा अधिक सक्षम करण्यावर भर द्यावा, असे मत आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे (एआयटी) अध्यक्ष मेजर जनरल केके चक्रवर्ती यांनी व्यक्त केले.



दिघी येथील आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या (एआयटी) वतीने 'एआयसीटीई अटल'च्या सहकार्याने 'सायबर सुरक्षा व एथिकल हॅकिंग'वरील प्राध्यापक विकास कार्यक्रमाचे (फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम) उद्घाटन मेजर जनरल केके चक्रवर्ती यांच्या हस्ते झाले. सहा दिवस चालणारा हा कार्यक्रम २ ते ७ डिसेंबर २०२४ या कालावधीत होत आहे. प्रसंगी 'एआयटी'चे संचालक ब्रिगेडियर अभय भट, सहसंचालक कर्नल एम. के. प्रसाद, प्राचार्य डॉ. बी. पी. पाटील, संयोजक डॉ. सुनील ढोरे, समन्वयक डॉ. सागर राणे आणि प्रो. सिता यादव आदी मान्यवर उपस्थित होते.

ब्रिगेडियर अभय भट यांनी या क्षेत्राचे महत्त्व, सध्याचे नोकरीतील बदलते स्वरूप आणि सायबर सिक्युरिटी क्षेत्रातील 'एआयटी'च्या योगदानाबद्दल आपले विचार मांडले. त्यांच्या प्रेरणादायी भाषणाने सहभागींच्या मनात सायबर सुरक्षेच्या दिशेने काम करण्याची नवी ऊर्जा निर्माण झाली. यामध्ये सायबर सुरक्षा आणि एथिकल हॅकिंग क्षेत्रातील प्रसिद्ध तज्ज्ञ व शिक्षणतज्ज्ञांचे सत्रे आयोजित करण्यात आले आहेत. हा कार्यक्रम ज्ञान वाढविणे, नाविन्यपूर्ण दृष्टिकोनाला चालना देणे आणि सायबर सुरक्षा क्षेत्रातील आव्हानांना तोंड देण्यासाठी सहभागींची तयारी करण्यावर भर देणार आहे, असे त्यांनी नमूद केले.

डॉ. सुनील ढोरे यांनी प्रोग्रामचा आढावा घेतला. कर्नल एम. के. प्रसाद यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेत मार्गदर्शन केले. डॉ. सागर राणे आणि प्रो. सिता यादव यांनी 'एआयसीटीई अटल'कडून अनुदान मिळवण्यात योगदान दिले. डॉ. बी. पी. पाटील यांनी आभार मानले.

# नळदुर्ग मैलारपूर येथील लाखों भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या खंडोबारायांची मुर्ती विराजमान

**नळदुर्ग/प्रतिनिधी:**

नळदुर्गच्या एतिहासिक पवित्र नगरीत दि ३ डिसेंबर रोजी पाहाटे ५ च्या सुमारास ढोल ताशाच्या गजरात व यळकोट येडकोट जय मल्हार च्या जय घोषात पालखीतुन आगमन झाले

यावेळी अनेक भाविक भक्तानी दर्शन घेतले आणि विधीवत पुजा करून खंडोबारायाच्या मुर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली .

यावेळी नळदुर्ग येथील मानकरी नागरिक खुप मोठ्या प्रमाणात उपस्थित होते .

अणदूर येथील खंडोबा मंदिरात भाविकांची खुप मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती परिसरातील भावीक भक्तांनी अणदूर नगरीत जाऊन श्री खंडोबा रायाचे दर्शन घेतले आहे . त्यानंतर खंडोबा रायाची मुर्ती पालखी मधुन नळदुर्ग येथील ऐतिहासिक मैलारपूर नगरीत आगमन होताच नळदुर्ग मध्ये ढोल तशाच्या गरजरात शोभेची दारू सह जल्लोषात स्वागत करण्यात आले ही पालखी राष्ट्रीय हायवे वरून मैलारपूर कडे मार्गक्रमणकरीत भक्तानी दोन्ही बाजुनी दर्शनासाठी गर्दी केली होती . यावेळी नळदुर्ग अणदूर सह परिसरातील नागरीक भक्त उपस्थित होते.

श्री खंडोबारायाची मुर्ती प्रतिष्ठापना झाल्या पासुन पावने दोन महिने नळदुर्ग ऐतिहासिक नगरीत वास्तव्यास मुर्ती ठेवण्यात आली आहे यानंतर श्री खंडोबाच्या दर्शनासाठी महाराष्ट्र कर्नाटक, मध्य प्रदेश, आध्रा प्रदेश आदि प्रांतातून पोर्णिमा पर्यंत लाखोंच्या संख्येने भाविक भक्त नळदुर्गच्या पावन नगरीत दाखल होण्याची दाट शक्यता आसल्याने नळदुर्ग येथील पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे सहाय्यक पोलीस निरीक्षक कांगुणे पोलीस उप निरीक्षक इश्वर नांगरे यांच्या मार्ग दर्शनाखाली जीवीशाचे धनंजय वाघमारे सह पोलीसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.




# ग्राहकांनी पाणी देयके १५ डिसेंबरपर्यंत भरावीत

**सातारा/प्रतिनिधी:**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे लष्कर पाणी पुरवठा केंद्रामार्फत पुरवठा होणाऱ्या ग्राहकांकडे ५ हजार किंवा त्यापेक्षा जास्त पाणी देयक थबाकी आहेत, अशा सर्व ग्रहाकांनी पाणी देयके १५ डिसेंबर पर्यंत भरावीत, असे आवाहन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यवस्थापन उपविभाग क्र. १ चे उपविभागीय अभियंता यांनी केले आहे.

थकबाकी भरणार नाहीत अशा ग्राहकांची नळजोडणी बंद करण्याची कार्यवाही १६ डिसेंबर पासून सुरु करण्यात येणार आहे. तसेच अवैधरित्या ( प्राधिकरणाची मंजूरी न घेता) नळजोडणी करुन घेतली आहे अशांनी प्राधिकरण कार्यालयात त्वरीत संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता व डिपॉझिट भरुन अवैध नळजोडणी वैध करुन घ्यावी, असेही प्राधिकरणाकडून कळविण्यात आले आहे.

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ कार्याध्यक्षपदी स्वामीनाथ हेगडे

**अक्कलकोट/प्रतिनिधी:**



माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या कार्याध्यक्षपदी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते स्वामीनाथ हेगडे यांची निवड करण्यात आली आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ या संघटनेच्या अक्कलकोट तालुका कार्याध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते स्वामीनाथ हेगडे यांची निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी दिले आहे. सदरची निवड ही दिनांक एक डिसेंबर २०२४ ते पुढील तीन वर्षापर्यंत राहणार आहे. माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे तालुका कार्याध्यक्ष स्वामीनाथ हेगडे हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक राजकीय क्षेत्रात काम करत आहेत. सध्या ते शिवसेना कामगार सेनेचे तालुकाप्रमुख म्हणून काम करत आहेत. स्वामीनाथ हेगडे यांच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. यावेळी बोलताना स्वामीनाथ हेगडे यांनी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या माध्यमातून विविध सामाजिक समस्यांवर आवाज उठविणार असल्याचे सांगितले.

# डबेवाडी येथून एकजण बेपत्ता

**सातारा/प्रतिनिधी:**

डबेवाडी, ता.सातारा येथून एकजण बेपत्ता झाल्याची फिर्याद सातारा तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, डबेवाडी, ता.सातारा येथून रामदास ज्ञानदेव मोरे (वय ५५, रा. कारी ता.सातारा) हे बेपत्ता झाले आहेत. ही घटना दि. ३ डिसेंबर रोजी घडली आहे. या घटनेची नोंद सातारा तालुका पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे.

# चंद्रशेखर गावस, राजीव मुळ्ये यांना गुंफण पुरस्कार जाहीर

## प्रकाश बेळगोजी, एल.डी.पाटील, संजय वेदपाठक यांचाही पुरस्कार

**सातारा/प्रतिनिधी:**

साहित्य, सामाजिक, सांस्कृतिक, पत्रकारिता आदी विविध क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सातारा जिल्ह्यातील गुंफण अकादमीच्या वतीने देण्यात येणाऱ्या गुंफण पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. पुरस्काराच्या मानकऱ्यांमध्ये चंद्रशेखर गावस, एल. डी. पाटील, राजीव मुळ्ये, संजय वेदपाठक आणि प्रकाश बेळगोजी यांचा समावेश आहे. अकादमीचे अध्यक्ष व गुंफण परिवाराचे प्रमुख डॉ. बसवेश्वर चेणगे यांनी ही माहिती दिली.

सीमा भागातील खानापूर (जि. बेळगाव) येथे २२ डिसेंबर रोजी होणाऱ्या विसाव्या गुंफण सद्भावना साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण होणार असल्याचे त्यांनी सांगितले. गोव्यातील प्रसिद्ध साहित्यिक व पत्रकार चंद्रशेखर गावस यांना यंदाचा गुंफण साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. दोन थेंबांचे आकाश हा काव्यसंग्रह तसेच माझी भावस्पंदने हा ललित लेखसंग्रह ही त्यांची पुस्तके विशेष गाजली आहेत. या पुस्तकांना चैतन्य शब्दांगण साहित्य गौरव पुरस्कार तसेच शांता शेळके साहित्य पुरस्कार लाभले आहेत. अखिल गोमंतक युवा मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले होते. पुढारी व तरुण भारतमध्ये पत्रकार म्हणून काही काळ त्यांनी काम पाहिले होते. अभिनयातही त्यांनी चुणूक दाखवली आहे.



सीमा भागातील ग्रामजीवन समृद्ध करण्यासाठी योगदान देणारे बिदरभावी (जि. बेळगाव) येथील सामाजिक कार्यकर्ते एल. डी. पाटील यांची गुंफण सामाजिक पुरस्कारासाठी निवड केली आहे. शासनाच्या विविध योजना शेतकरी वर्गापर्यंत पोहोचवून त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी त्यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. त्याचबरोबर महिला सक्षमीकरणासाठी त्यांनी भरीव प्रयत्न केले आहेत. साताऱ्च्या रंगभूमीचा वारसा समृद्ध करण्यात मौलिक कामगिरी बजावणारे प्रसिद्ध रंगकर्मी व पत्रकार राजीव मुळ्ये यांना गुंफण सांस्कृतिक पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. लोकरंगमंच नाट्यसंस्थेचे सदस्य असलेले राजीव मुळ्ये हे गेली चार दशके प्रायोगिक रंगभूमीवर सक्रिय आहेत.

नाट्यलेखन, दिग्दर्शन, अभिनय आणि संगीत संयोजन या सर्वच बाबतीत त्यांनी आपला ठसा उमटवला आहे. पत्रकारितेत तीस वर्षे त्यांनी योगदान दिले आहे. कामगार चळवळ, साहित्य अशा विविध क्षेत्रात ठसा उमटवलेले पुण्यातील संवेदनशील सामाजिक कार्यकर्ते संजय वेदपाठक यांना गुंफण सद्भावना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पोस्ट खात्यातील कामगार संघटनेत बारा वर्षे विविध पदांवर कार्यरत राहिलेल्या वेदपाठक यांनी कवी म्हणूनही नावलौकिक मिळवला आहे. मुक्या जीवांसाठी त्याचप्रमाणे अनाथ मुलांसाठी उदार अंतःकरणाने, सढळ हाताने मदत करून त्यांनी त्यांच्यातील संवेदनशीलता दाखवून दिली आहे.

सीमाप्रश्न, बेळगावच्या मराठी माणसांचा आवाज महाराष्ट्रासह केंद्रापर्यंत पोहोचविण्याचे काम तडफेने करणारे सीमा भागातील बेळगाव लाईव्ह या मराठी डिजिटल न्यूज मीडिया हाऊसचे संपादक प्रकाश बेळगोजी यांना शंकर पाटील गुंफण पत्रकारिता पुरस्कार देण्यात येणार आहे. बेळगावमधील अनेक स्थानिक वर्तमान पत्रांमधून तसेच आयबीएन लोकमत, जय महाराष्ट्र, मी मराठी वाहिन्यांसाठी उत्तर कर्नाटक रिपोर्टर अशा विविध स्तरावरील पत्रकारिता गाजविणाऱ्या प्रकाश बेळगोजी यांना अलीकडेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने एकलव्य पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

# आयसीआयसीआय प्रूडेंशियल लाइफ इन्शुरन्सच्या मोबाइल ॲप आयप्रू एज ने ९८.१% इन्शुरन्स एजंटना दिले एकाच दिवशी कमिशन

**सातारा/प्रतिनिधी:**

आयसीआयसीआय प्रूडेंशियल लाइफ इन्शुरन्सने सल्लागारांसाठी खास तयार केलेला आयप्रू एज ॲप वापरणाऱ्या सल्लागारांच्या उत्पादकतेत H1-FY२०२५ मध्ये ३७% वाढीचा अनुभव आला. ज्यामुळे त्यांच्या कमाईतही वाढ झाली. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, आयप्रू एज ॲप (IPRU Edge) वापरणाऱ्या ९८.१% एजंटना एकाच दिवशी त्यांचे कमिशन प्राप्त झाले.

आयसीआयसीआय प्रूडेंशियल लाइफ इन्शुरन्स ही पहिली जीवन विमा कंपनी आहे, जी निवडक वितरकांना एकाच दिवशी कमिशन देते. कंपनीकडे २ लाखांहून अधिक इन्शुरन्स सल्लागारांचे भक्कम जाळे आहे. कंपनीचे ६१% प्रमुख सल्लागार आता ॲपचा सक्रियपणे वापर करत आहेत. ज्यामुळे त्यांना व्यवसाय वाढवण्यास मदत मिळते.

हे मोबाइल ॲप एजंटसाठी एक कार्यालयासारखे कार्य करणारे टूल आहे. जे त्यांना नवीन व्यवसायाच्या विकासावर लक्ष केंद्रित करण्यास मदत करते. यात प्रत्येक कामासाठी इन्शुरन्स एजंटना प्रशासकीय कार्यांच्या वेळखाऊ कामात गुंतण्याची गरज नाही.



आयप्रू एज ॲप (IPRU Edge) रिअल-टाइम के. वाय. सी. प्रमाणीकरण सुलभ करते आणि ओसीआर तंत्रज्ञानामुळे ग्राहकांना कागदपत्रांरहित खरेदीचा अनुभव मिळतो. हे ॲप लहान शहरे आणि गाव खेड्यांमध्ये विखुरलेल्या गुंतवणूक सल्लागारांसाठी उपयुक्त आहे.

H1-FY२०२५ मध्ये, कंपनीने आपल्या एजन्सी चॅनेलकडून प्राप्त झालेल्या रिटेल वेटेड प्रिमियममध्ये ४९% ची वार्षिक वाढ नोंदवली, जी ॲपद्वारे दिलेल्या सुविधेमुळे शक्य झाली.

याविषयी आयसीआयसीआय प्रूडेंशियल लाइफ इन्शुरन्सच्या विपणन विभागाचे प्रमुख (प्रॉपायटरी चॅनेल) शोबी सॅम म्हणाले, आमचा आयप्रू एज मोबाइल ॲप (खझठण एवसश) इन्शुरन्स एजंटना व्यवसाय वाढवण्यास सक्षम करत आहे. H1-FY२०२५ मध्ये आम्ही पाहिलेली ३७% ची उत्पादकता वाढ याचेच एक उदाहरण आहे. त्याचबरोबर आयप्रू एज ( IPRU Edge ) ॲप वापरणाऱ्या ९८.१% सल्लागारांना एकाच दिवशी कमिशन मिळाले. या उपक्रमांमुळे आम्हाला देशातील सर्वात सल्लागार-मैत्रीपूर्ण जीवन विमा कंपनी बनण्यास मदत झाली आहे.

आम्ही बदलत्या तंत्रज्ञानाचे पर्याय राबवले आहेत. ज्यामुळे बचत व्यवसाय क्षेत्रातील ५०% पॉलिसी एकाच दिवशी इश्यू केल्या गेल्या, असेही ते पुढे म्हणाले.

आयप्रू एज (IPRU Edge) ॲप सल्लागारांना प्रशासकीय कामांपासून मुक्त ठेवून नवीन व्यवसाय विकासावर लक्ष केंद्रित करण्यास सक्षम करते. या ॲपच्या मदतीने सल्लागार नवीन व्यवसायासाठी लॉग इन करू शकतात. आम्ही सल्लागारांना नवीन व्यवसायाच्या संधी, मागणी निर्माण करणे यासारख्या सेवा देखील प्रदान करतो. हे सल्लागारांना त्यांच्या ग्राहकांची प्रभावीपणे सेवा देण्यास मदत करते. हा मोबाइल ॲप आमच्या सल्लागारांना त्यांच्या व्यवसायाची आणि कमाईची तपशीलवार माहितीही देते.

# रेड रिबीन कलब व ग्रामीण रुग्णालय यांच्या वतीने कल्याणशेट्टी महाविद्यालयात एड्स जनजागृती रॅली संपन्न

**अक्कलकोट/ प्रतिनिधी:**

जागतिक एड्स जागृती दिनानिमित्त मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय रेड रिबीन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिनानिमित्त शहरात जनजागृती रॅली काढण्यात आली.



रॅलीचा प्रारंभ वैद्यकीय अधिकारी डॉ सतीश बिराजदार व संस्थेचे संचालक मल्लिनाथ मसुती यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, जुनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, प्रयोगशाळा तंत्रज्ञ राघवेंद्र करजगीकर, समुपदेशक मारुती धर्मसाले, वरिष्ठ क्षयरोग पर्यवेक्षक नजीर अहमद दलाल, एनजीओ प्रकल्प प्रमुख मल्लिकार्जुन पाटील, वरिष्ठ मलेरिया पर्यवेक्षक बसवराज याबाजी आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना वैद्यकीय अधिकारी डॉ बिराजदार म्हणाले की, अक्कलकोट परिसरातील ग्रामीण भागात जनजागृती झाल्यामुळे एड्स रुग्णांचे प्रमाण कमी झाले आहे. एड्स चे प्रबोधना मुळे हे यश मिळाले आहे. समाजातील सर्व घटकांनी सामुदायिक प्रयत्न केल्यास एड्स रोगाचे निर्मूलन होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

रॅलीचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा राजेश पवार व प्राध्यापिका शितल झिंगाडे- भस्मे यांनी केले, रॅलीमध्ये प्रा डॉ बाळासाहेब पाटील, प्रा भिम सोनकांबळे, प्रा मनीषा शिंदे यांच्यासह २१५ स्वयंसेवक उपस्थित होते.

या उपक्रमाबद्दल स्वयंसेवक व अधिकाऱ्यांचे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी यानी अभिनंदन केले.

स्वयंसेवकांनी घेतली एड्स जनजागृतीची शपथ रॅलीसाठी उपस्थित असणाऱ्या स्वयंसेवकांनी आपल्या परिसरात एड्स बाधित व्यक्ती दिसणार नाही त्यासाठी ग्रामस्थांचे प्रबोधन करू अशी शपथ घेतली.

# भगवान पाटील यांचे निधन

**कराड/प्रतिनिधी:**



आटके ता. कराड येथील भगवान नामदेव पाटील (वय ८२) यांचे सोमवारी दि. २ रोजी निधन झाले. आटके टप्पा ते आटके दरम्यान राहणारे भगवान पाटील हे रेठरेकर आबा म्हणून परिचित होते.

शेतीत रममान असणारे व मनमिळाऊ स्वभावाचे असणारे पाटील गेल्या काही दिवसापासून वयोमानामुळे घरीच असायचे. सोमवारी दुपारी त्यांचे राहते घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुली, नातवंडे असा परिवार आहे. आटके येथे आज बुधवारी सकाळी रक्षाविसर्जन विधी पार पडला.



# कोळे हायस्कूलमध्ये चित्रकला स्पर्धा संपन्न

**कराड/प्रतिनिधी:**

श्री संत घाडगेनाथ हायस्कूल कोळे येथे चॅम्प्स ड्रॉइंग कॉम्पिटिशन व आयसीटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले होते. चित्रकला स्पर्धेमध्ये आमच्या विद्यालयातील ११६ स्पर्धक सहभागी झाले होते.. या स्पर्धेमध्ये मोठ्या गटातून उत्तेजनार्थ वेदांत हनुमंत शिंगण इयत्ता दहावी याला मेडल रोख रक्कम ५०० रुपयांचे बक्षीस मिळाले.

त्याचबरोबर मोठ्या गटातून उत्तेजनार्थ कु. वेदांती आबासो पाटील या विद्यार्थिनीला मेडल व रोख रक्कम ५०० रुपयांचे बक्षीस मिळाले. लहान गटातून उत्तेजनार्थ आयुष सुनील चव्हाण इयत्ता पाचवी या विद्यार्थ्याला मेडल व रोख रक्कम ५०० रुपयांचे बक्षीस मिळाले. लहान गटातून उत्तेजनार्थ वेदांतिका अरविंद देशमुख इयत्ता सातवी या विद्यार्थिनीला मेडल व रोख रक्कम ५०० रुपयांचे बक्षीस मिळाले.

सातारा जिल्हा विभागीय उत्तेजनार्थ क्रमांक कु. आर्या सुरेश पाटील हिला मेडल, ट्रॉफी व रोख रकमेचे पारितोषिक २५०० रुपयांचे मिळाले. त्याचबरोबर कु.प्राची संतोष भोसले हिला मेडल, ट्रॉफी व रोख रकमेची पारितोषिक २५०० हजार रुपयांची मिळाले. बक्षीस वितरण इयत्ता दहावीतील पालकांच्या शुभ हस्ते करण्यात आले..

या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक डाळे संगणक शिक्षक श्री शिंदे सर यांचे सहकार्य लाभले..

# हवाई मल्लिनाथ महाराज इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये पालक सभा उत्साहात संपन्न

**अक्कलकोट/प्रतिनिधी:**

हवाई मल्लिनाथ इंग्रजी मीडियम स्कूल मध्ये पालक सभा अतिशय उत्साहात आणि आनंदी वातावरणात संपन्न झाली. नंदगाव येथील हवाई मल्लिनाथ महाराज स्कूलमध्ये ही पालक सभा खेळीमेळीच्या वातावरणात रविवार दिनांक ०१ डिसेंबर २४ रोजी संपन्न झाली.

प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन संस्थेचे पदाधिकारी व महिला पालक यांच्या हस्ते करण्यात आली यानंतर शाळेमधील शिक्षकांनी आपला परिचय करून दिला आणि सभेला सुरुवात झाली यामध्ये सर्वप्रथम उपस्थित पालकांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले यावेळी काही पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले विद्यार्थ्यांची गुणवत्ता याविषयी मनोगत व्यक्त करण्यात आले तसेच पालक व शिक्षक यांच्या सुसंवादातून विद्यार्थ्यांची गुणवत्ता याविषयी चर्चा करण्यात आली तसेच महाराष्ट्र स्तरावरील चित्रकला स्पर्धेत धाराशिव जिल्ह्यामध्ये यश प्राप्त केलेल्या रोहित पवार व हर्षद राठोड यांचा सत्कार संस्थेकडून करण्यात आला यावेळी त्यांना सर्टिफिकेट आणि ट्रॉफी देऊन कौतुक करण्यात आले यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ पवार मॅडम यांनी पालक शिक्षक व विद्यार्थी याविषयी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले यानंतर संस्थेच्या सचिव सौ पूजा घंटे मॅडम यांनी पालक व शिक्षक यांची जबाबदारी व विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ याविषयी मत व्यक्त केले.



तसेच संस्थेचे आधारस्तंभ श्रीयुत कलासागर घंटे सर यांनी मार्गदर्शन करून पालकांच्या समस्या व विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल असे आश्वासित केले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सौ जमुना घंटे मॅडम या होत्या प्रास्ताविक पाटील सर यांनी केले तर उपप्राचार सौ ऐश्वर्या मोरे मॅडम यांनी आभार व्यक्त केले हा कारेक्रम यशस्वी होण्यासाठी औदुत घंटे सर व शिक्षक वृंध यांनी प्रयत्न केले.


**सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.**

## नशिबाची परीक्षा

गुरुवार ५ डिसेंबर २०२४

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ७-१-० मजबुत

| उदय-अस्त | | | जोड |
|---|---|---|---|
| 124<br>467<br>700 | 7-3 | 120<br>490<br>670 | 76-43-81-39-05 |

### कल्याणम

उदय-अस्त | सिंगल ५-८-२ मजबुत

| उदय-अस्त | | | जोड |
|---|---|---|---|
| 140<br>230<br>780 | 5-6 | 240<br>268<br>600 | 51-76-84-29-63 |

### मुंबैम (मेन )

उदय-अस्त | सिंगल १-२-७ मजबुत

| उदय-अस्त | | | जोड |
|---|---|---|---|
| 146<br>470<br>344 | 1-0 | 145<br>190<br>118 | 14-80-29-37-05 |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

## आज का अंदाज

गुरुवार दिनांक ५ डिसेंबर २०२४

| कल्याण बाजार | मुंबई बाजार |
|---|---|
| 'पत्थर फोड एकच' | 'पत्थर फोड एकच' |
| ३ - ६ - ९ - ० | ३ - ४ - ७ - ८ |
| १२०-११४-४७८-१२७ | २३८-२६६-१६०-१८९ |
| ३००-२७७-५५८-२८० | ५८०-७७०-३५९-३७८ |
| २२९-३३०-३६०-५६९ | ३३७-५९०-२७८-२२४ |
| जोडी | जोडी |
| ३१ - ६१ - ९२ - ०२ | ३० - ४० - ७१ - ८१ |
| ३५ - ६५ - ९७ - ०७ | ३६ - ४६ - ७५ - ८५ |
| ३८ - ६८ - ९४ - ०४ | ३२ - ४२ - ७९ - ८९ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस ०५-०६ डिसेंबर

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

गुरुवार दिनांक ५ डिसेंबर २०२४

| सर्व बाजार साठी | | | | |
|---|---|---|---|---|
| | २१ | ५१ | ६० | ९० |
| | २३ | ५३ | ६७ | ९७ |
| | २४ | ५४ | ६८ | ९८ |
| | १२९ | ३६६ | २७७ | ४७८ |
| | ६७९ | ४४७ | ३३० | ५६७ |
| | ५८९ | ५०६ | १७८ | ३८८ |

टिप- कल्याण व मुंबई करिता व सर्व बाजारासाठी ६० पानाचा चार्ट मिळेल १००% खात्रीशीर फक्त सोमवारी मिळेल

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

# विधिमंडळ गटनेतेपदी देवेंद्रजी फडणवीस यांच्या निवडीबद्दल भाजपा कोल्हापूरच्या वतीने आनंदोत्सव

**कोल्हापूर/प्रतिनिधीः**

भारतीय जनता पार्टीच्या विधिमंडळ गटनेतेपदी एक मताने देवेंद्रजी फडणवीस यांची निवड झाल्याबद्दल आज भाजपा जिल्हा कार्यालय या ठिकाणी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात आनंदोत्सव साजरा केला.

भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी देवेंद्रजी आप आगे बढो हम तुम्हारे साथ है, भारतीय जनता पार्टीचा विजय असो अशा घोषणा देत एकमेकांना लाडू भरून हा आनंदोत्सव साजरा केला.

याप्रसंगी बोलताना जिल्हाध्यक्ष विजय जाधव म्हणाले, संपूर्ण महाराष्ट्राच्या दृष्टीने आजचा दिवस अत्यंत आनंदाचा आहे.

सर्वसामान्य जनता आणि आम्हा सर्व कार्यकर्त्यांची इच्छा होती की या महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी पुन्हा एकदा देवेंद्रजी फडणवीस व्हावेत आज इच्छा पूर्ण होत आहे.



आम्हाला अपेक्षा आहे की ज्या पद्धतीने २०१४ ते १९ च्या काळात महाराष्ट्र सगळ्या बाबतीत एक नंबर होता तसाच पुन्हा एकदा उद्योग, व्यापार, क्रीडा, पर्यटन, आरोग्य असेल अशा सर्व क्षेत्रांमध्ये देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र पुन्हा एकदा भरारी घेईल.

याप्रसंगी विजय जाधव, महेश जाधव, राहुल चिकोडे, नाथाजी पाटील, हंबीरराव पाटील, गायत्री राऊत, डॉ. सदानंद राजवर्धन, विठ्ठल पाटील, संगीता खाडे, राजू मोरे, शैलेश पाटील, राजसिंह शेळके, भरत काळे, विशाल शिराळकर, गिरीष साळोखे, महेश यादव, अशोक लोहार, सयाजी आळवेकर, दिलीप बोंद्रे, विजय गायकवाड, भिकाजी जाधव, दत्तात्रय मिडशिंगे, शिवाजी बुवा, विजय आगरवाल, अरविंद वडगावकर, ॲड. संपतराव पवार, दिलीप मैत्राणी, रीमा पालनकर, मनोज इंगळे, रविकिरण गवळी, निरंजन घाटगे, सुमित पारखे, रोहित करंडे, विवेक कुलकर्णी यांच्यासह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

# नांदगावात दिव्यांग तरुणाला दिली व्हिलचेअर

## रघुनाथ महाराज यात्रा व जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य

**कराड/प्रतिनिधीः**

नांदगाव ता.कराड येथील रघुनाथ महाराज यात्रा व जागतिक दिव्यांग दिन याचे औचित्य साधून गावातील यश मारुती फाळके या दिव्यांग तरुणाला व्हील चेअर भेट देण्यात आली.

यश फाळके या तरुणाला काही वर्षांपूर्वी अपघाताने अपंगत्व आले.त्यामुळे या तरुणाला चालणे तर दूर पण हालचालही करणे अवघड बनले आहे. मोलमजुरी करणाऱ्या पालकांना त्याची देखभाल करतानाही अवघड जात आहे. ही बाब लक्षात घेऊन रघुनाथ महाराजांच्या यात्रेचे औचित्य साधत, सामाजिक बांधिलकीतून,'जनसेवा हिच ईश्वरसेवा' मानून संबंधीत तरुणाला व्हीलचेअर देवून त्या परिवाराला दिलासा देण्याचा अल्पसा प्रयत्न केला.यासाठी एनेबलर संस्थेचे अमोल शिणगारे व शिवशाही फौंडेशन चे बाळाराम माडकर यांचे सहकार्य लाभले.



दक्षिण मांड व्हॅली शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष वि.तु. सुकरे ( गुरुजी) यांचे हस्ते व्हीलचेअर चे वितरण करण्यात आले. यावेळी त्याचे वडील मारुती फाळके, आई सौ.लता फाळके, भाऊ अनिल फाळके यांच्या चेहऱ्यावर आनंद लपून राहिला नाही.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य इंजि. प्रशांत सुकरे, प्रा.संजय घाटे, उद्योजक जगन्नाथ कुचेकर, सुभाष पाटील (महाराष्ट्र पोलीस) , सतीश कडोले, सुभाष पाटील (महाराज), प्रफुल्ल कुचेकर, विनायक कडोले, गणेश कडोले, मुरलीधर आमणे,राजेंद्र हावरे, शरद शिणगारे, तुळशिदास शेटे, संभाजी पाचंगे, भाग्येश पाटील, विजय घाटे, सुर्यकांत नलवडे, स्वप्नील पाटील, शिवप्रसाद शेटे, परेश शेटे, वैभव शेटे, संदीप हावरे, आकाश आरबुणे, शशिकांत माळी, आनंदा कुचेकर, निलेश माळी, निखिल कडोले, रोहित मुळीक, उदय चौधरी, संजय तलबार, प्रणव तांबवेकर, माणिक नगरे, धनाजी धारवट, रघुनाथ खिरवडे, मोहित सुकरे, देवेंद्र सुकरे आदी उपस्थित होते.

# अनेकांना जिवदान देणारे नारायण आप्पा यांचे निधन

**विटा/प्रतिनिधीः**

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा शहरातील (आडवी पेठ) येथील विटा येथे बांगडी व्यावसायिक प्रसिद्धीकारक म्हणून संपूर्ण सांगली जिल्ह्यासह खानापूर तालुक्यात कै नारायण बापूराव कोकीळ उर्फ (अण्णा) या नावाने अप्पांची ओळख होती.



कोकीळ हे विटा शहरात अत्यंत आपुलकीने प्रतेकाशी विचारांची धारा जपत होते त्यांच्या कुटुंबियात पत्नी दोन मुली एक मुलगा नात नाती असा परिवार आहे. आगदी आनदीमय हे कोकीळ कुटुंब होते शिवाय अप्पा हे झाड पाला व अन्य फळ फळावातून एखादा आजार कसा बरं करता येईल हे त्यांचा फार मोठा अभ्यास होता शिवाय हाताला त्यांच्या गुण ही तितकाच होता. अनेकांना अप्पांनी जिवदान दिले आहे.

या खरे वैशिष्ट्य म्हणजे काविळ नागिन सह अन्य आजारावर झाड पाल्यांचे वनस्पती पाल्यांचे औषध तयार करून अशा आजार असल्यास ते पेशंटना काविळ व नागिन वर औषध देत होते. या मुळे अनेकांना अप्पांनी या आजारातून बरे केले आहे त्यामुळे कोकीळ अप्पा हे सांगली जिल्ह्यासह खानापूर तालुक्यात नाव प्रसिद्ध होते.

आज वयाच्या ८३ वर्षी अनेकांना जिवदान देणार सर्वांचे अप्पा आज ८३ वर्षी त्यांच्या राहत्या घरी अल्पशा आजाराने दुःखत निधन झाले. रक्षाविसर्जन शुक्रवार दिनांक ६ रोजी सकाळी ८ वाजता कासार गल्ली येथील वैकुंठ स्मशानभूमीत होणार आहे.

# संविधानाचा आधुनिक राष्ट्र निर्मितीचा संकल्प साकारण्याचे आव्हान

## अन्वर राजन

**सातारा/प्रतिनिधीः**

देशासमोर भारतीय संविधानाचा आधुनिक राष्ट्र निर्माण करण्याचा संकल्प साकार करण्याचे आव्हानआहे, असे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अन्वर राजन यांनी व्यक्त केले.

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त संबोधी प्रतिष्ठानच्या वतीने पाठक हॉलमध्ये आयोजित केलेल्या ३८ व्या थोरांच्या स्मृती व्याख्यानमालेत संविधान जागरच्या 'राष्ट्रवाद, अल्पसंख्यांक व संविधान' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ.आत्तर होते. विचारमंचावर संबोधी प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिनकर झिंब्रे ,उपाध्यक्ष रमेश इंजे ,विश्वस्त प्राचार्य डॉ.संजय कांबळे उपस्थित होते.



अन्वर राजन म्हणाले, भारतीय राष्ट्रवादाचा धर्मनिरपेक्षता, बंधुता व समता हा पाया आहे. राष्ट्र धर्म व भाषा या आधारे निर्माण होत नाही. फाळणीचा इतिहास सकारात्मक मांडण्याऐवजी खोट्या पद्धतीने सांगितला जातोय. खराखुरा इतिहास समजून घेण्याची गरज आहे.मुस्लिमांची भाषा प्रदेश निहाय स्थानिकच आहे. हे वास्तव समजून घेतले पाहिजे.

आधुनिक भारतात सर्वधर्मीयांना, अल्पसंख्याकांना पुरेसा अवकाश व नागरिकत्वाचे सर्व अधिकार मिळण्याची आवश्यक आहे. देशात हिंदू मुस्लिम प्रश्न पेटवून त्यांचा नाहक छळ करण्यात येत आहे.जातीयता व अस्पृश्यतेचा चटका बसल्याने धर्मांतरित झालेले

मुस्लिम ,ख्रिश्चन इथलेच मूळ भारतीय आहेत. त्यांनी भारतीय संस्कृती, भाषा आदींचे वैविध्य टिकवून ठेवले आहे . सुफी संतांचे मठ सर्वांसाठी खुले राहिले आहेत. प्रबोधन चळवळींचा, धर्मांचा इतिहास समजून घेण्याची गरज आहे असे अन्वर राजन यांनी सांगितले.

प्रास्ताविक प्राचार्य संजय कांबळे यांनी केले. प्रसाद गायकवाड यांनी आभार मानले.कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विटा हायस्कूलमध्ये पालक मेळावा संपन्न

**विटा/प्रतिनिधीः**

विटा हायस्कूल विटा येथे द्वितीय सत्रातील सन २०२४ २५ मधील दुसऱ्या पालक सभेचे आयोजन करण्यात आलेले होते. या पालक सभेचे अध्यक्ष स्थान विद्यालयाचे प्राचार्य जाधव यांनी भूषवले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक, शिक्षक व विद्यार्थी यांचा त्रिवेणी संगम किती महत्त्वाचा असतो हे जाधव सरांनी सर्व पालकांना समजावून सांगितले. विटा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचा स्कॉलरशिप परीक्षा, विविध क्रीडा स्पर्धा मधील यश प्राचार्यांनी पालकांसमोर ठेवले. रोजच्या दैनिक व्यापातून पालकांनी आपले पाल्य नेमके काय करतो, त्याची प्रगती कुठे पर्यंत आहे, त्याची प्रगती कुठे पर्यंत व्हायला हवी याबाबत पालकांनी नेहमीच जागरूक राहायला हवे असे सांगितले.

विद्यार्थ्यांची उपस्थिती, शिस्त तसेच त्यांची गुणवत्ता पालक- शिक्षक मिळून नेहमीच वाढते ठेवण्याची हमी दिली. या कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार शिराज भाई शिकलगार उपस्थित होते. त्यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना रस्त्यावरील सुरक्षिततेबाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांनी नेहमी स्वतःमध्ये नवनवीन गुण विकसित करून गुणवत्ता कशी वाढवावी. याबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवार यांनी केले. शिक्षक मनोगतात वारे एस.बी यांनी विद्यार्थ्यांनी कसे वागायला हवे व पालकांनी त्यांना कसे प्रोत्साहन द्यायला हवे याबाबतच्या अपेक्षा व्यक्त केल्या. इयत्ता पाचवी सहावी सातवी व आठवीचे विद्यार्थी तसेच त्यांचे पालक व सर्व शिक्षक यांनी या कार्यक्रमात उपस्थिती दर्शवली. शेवटी देशमुखे सरांनी सर्वांचे आभार मानले. व कार्यक्रम संपन्न झाला.

# वेगवेगळ्या घटनेत दोनजण बेपत्ता

**सातारा/प्रतिनिधीः**

सातारा शहर व सातारा तालुका हद्दीतून दोन वेगवेगळ्या घटनेत दोघेजण बेपत्ता झाले आहेत. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, पोवई नाका परिसरातून राहूल दिलीप सुर्यवंशी (वय ३६, मूळ रा.ठाणे) हे बेपत्ता झाले आहेत. याप्रकरणी त्यांचे मित्र राहूल पवार यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. ही घटना दि. १ डिसेंबर रोजी घडली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. दुसर्या घटनेत संदीप बबन सरडे (वय ३०, रा. आकले ता.सातारा) हे बेपत्ता झाले आहेत. ही घटना दि. १ डिसेंबर रोजी घडली आहे. याप्रकरणी बबन कृष्णदेव सरडे (वय ६०, रा.आकले) यांनी सातारा तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.


महावितरण

## ई-निविदा सुचना

महावितरण तर्फे अधीक्षक अभियंता (स्था), स्थापत्य मंडल कार्यालय पुणे अंतर्गत अनुभवी कंत्राटदारांकडुन महावितरणचे सातारा येथील विविध कार्यालयासाठी साफसफाई व पाणी व्यवस्थापन इत्यादि कामे करणेसाठी महावितरणमधील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून निविदा क्र. T-46/2024-25 साठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महावितरणच्या संकेतस्थळावर (https://etender.mahadiscom.in/eatApp) दि.०५.१२.२०२४ ते १२.१२.२०२४ पर्यंत सकाळी १२.०० Hrs वाजेपर्यंत उपलब्ध आहेत व दि. १२.१२.२०२४ रोजी दुपारी १५:००वी वाजेपर्यत स्वीकारण्यात येतील. निविदासंदर्भात अधिक माहितीसाठी अति.कार्यकारी अभियंता (स्था) स्थापत्य मंडल, पुणे यांच्या भ्रमणध्वनी क्र.७७६७०००५४८ वर संपर्क साधावा. निम्नस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. निविदेबाबत काही मुदतवाढ किंवा शुद्धी पत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील "Announcements"मध्येच कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

स्वा/-
अधीक्षक अभियंता (स्था),
स्थापत्य मंडल पुणे.

PRO No. PZ- 173/24-25


# उद्योजक होऊ इच्छिणाऱ्यांनी अमृत संस्थेच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ घ्यावा

**सातारा/प्रतिनिधीः**

उद्योग क्षेत्राची कमी माहिती आणि आत्मविश्वासाचा अभाव यामुळे अनेकजण उद्योजकतेकडे वळण्यात मागे पडतात. त्यामुळे युवक, युवतींमध्ये उद्योजकतेचे प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेऊन अमृत संस्थेने हे महत्वकांक्षी प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या जिल्हा प्रकल्प अधिकारी शितल पाटील यांनी केले आहे.

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (-चठणढ) आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (चउएऊ) यांच्यात अमृत सूर्यमित्र प्रशिक्षण योजना, अमृत-आयात निर्यात प्रशिक्षण योजना आणि अमृत-बेकरी प्रशिक्षण या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी सामंजस्य करार करण्यात आला.

अमृत संस्थेच्या सोलर पी.व्ही. इंस्टॉलेशन, आयात-निर्यात आणि अमृत-बेकरी प्रशिक्षण योजना या तिन्ही निवासी प्रशिक्षण योजनांचा कालावधी १८ दिवसांचा आहे. यात ८०% तांत्रिक प्रशिक्षण व २०% उद्योजकता विकास यावर भर देण्यात येणार आहे. आयात-निर्यात प्रशिक्षण यामध्ये आयात-निर्यात प्रक्रिया, परकीय व्यापार धोरण याबद्दल मार्गदर्शनही केले जाणार आहे. सूर्यमित्र प्रशिक्षण, अमृत - बेकरी प्रशिक्षण योजनेत फक्त तांत्रिक ज्ञानच मिळणार नसून उद्योग उभारणीसाठी मदत केली जाणार आहे. योजनांची वैशिष्ट्ये म्हणजे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर प्रकल्प अहवाल,कर्ज प्रस्ताव, उद्योग नोंदणी, कच्चा माल खरेदी याबाबत अमृत संस्था मार्गदर्शन करणार आहे. युवक, युवती www.mahaamrut.org.in या संकेतस्थळाला भेट द्यावी, असेही आवाहन श्रीमती पाटील यांनी केले आहे.

# उपजिल्हा रुग्णालय कराड येथे जागतिक एडस दिनाच्या सप्ताहास सुरवात

**कराड/प्रतिनिधीः-**

उपजिल्हा रुग्णालय कराड येथे जागतिक एड्स सप्ताह साजरा करण्यात येत आहे. मार्ग हक्काचा,सन्मानाचा हे यावर्षीचे घोषवाक्य आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कराड तालुका विधी सेवा समितीच्या ४ चे सहदिवाणी न्यायाधिश क स्तर ए. व्ही. मोहिते व अध्यक्ष डॉ. सुनिला लाळे यांनी उपस्थितांना एचआयव्ही विरुध्द लढा देण्याचा एआरटी व आयसीटीसी विभागामधील समुपदेशन तपासणी व उपचार सुविधांचा लाभ घेण्यासंदर्भात आवाहन केले. बार कौन्सील सदस्य ॲड. भारत मोहिते यांनी एचआव्ही बाधीतांना मार्गदर्शन केले. ॲड. शुभम जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. ॲड साईप्रसाद पाटील सचिव बार असोसिएशन तसेच ॲड. दिग्वीजय पाटील व ॲड. किशोर जाधव-विधी सेवा समिती व जितेंद्र भोपते हे कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमास नोडल अधिकारी डॉ. प्रशांत देसाई, एआरटी विभागाचे वरिष्ठ वैदयकिय अधिकारी डॉ. संगिता यादव, पितांबर ठोंबरे, सोनाली माने, डॉ. वसिमा अन्सारी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. वाघेरी येथील नर्सिंग कॉलेजचे विध्यार्थी व प्राध्यापक यांनी सहभाग घेउन पथनाटय सादर केले.

सदर कार्यक्रमास डॉ. मुर्सरतजहान शेख, डॉ. वसिमाबानु अन्सारी, महेश शिंदे, नवनाथ हेंद्रे, प्रतिभा गुरसाळे, सुनिती थोरात, धनश्री पाटील, कोमल सुतार, वैशाली पवार, जालींदर शेटे, सुनिता पवार यांच्या सहकार्याने यशस्वीपणे साजरा झाला. तसेच विहान संस्था यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.




सूत्रसंचालन स्मिता शिंदे यांनी केले, आभार महेश उनउने यांनी मानले.

जागतिक एडस दिनाच्या सप्ताहात एआरअटी व आयसीटीसी समुपदेशक यांचे विविध शाळा, महाविदयालय मध्ये जनजागृतीपर व्याख्याने आयोजित केले आहेत.

# युरोकुल युरोलॉजी इन्स्टिट्यूटतर्फे ७ व ८ डिसेंबरला 'रिकन्स्ट्रक्टीव्ह युरोलॉजी'वर आंतरराष्ट्रीय कार्यशाळा

## युरोकूल हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. संजय कुलकर्णी यांची माहिती

**पुणे/प्रतिनिधीः**

मूत्राशयाच्या किचकट शस्त्रक्रियांचे प्रात्यक्षिक, मूत्राशय व प्रोस्टेट संबंधित गुंतागुंतीचे आजार, तसेच आधुनिक उपचार पद्धती याविषयी चर्चा करण्यासाठी बाणेर येथील युरोकुल युरोलॉजी इन्स्टिट्यूटच्या वतीने दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय कार्यशाळा आयोजिली आहे. येत्या ७ व ८ डिसेंबर २०२४ रोजी ही कार्यशाळा होणार असल्याची माहिती युरोलॉजिकल सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. संजय कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी भारतातील पहिल्या महिला लॅप्रोस्कोपी सर्जन डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी, युरोलॉजिस्ट डॉ. पंकज जोशी आदी उपस्थित होते.

डॉ. संजय कुलकर्णी म्हणाले, दोन दिवसांच्या या कार्यशाळेत जवळपास ३५ ते ४० शस्त्रक्रिया होणार असून, 'युरोकुल'मध्ये होणाऱ्या या शस्त्रक्रियांचे लाईव्ह प्रक्षेपण बंतारा भवन येथील सभागृहात जगभरातून आलेले युरोलॉजिस्ट पाहणार आहेत. डॉ. संजय कुलकर्णी, डॉ. पंकज जोशी यांच्यासह लंडन येथील प्रा. अँथनी मंडी, इटली येथील डॉ. गुइडो बार्बगली, तामिळनाडू येथील डॉ. गणेश गोपालकृष्णन, लंडन येथील ज्युलियन शाह, डॉ. मिरोस्लाव्ह दोर्डोव्हिक, कतार येथील डॉ. तारिक अब्बास, अमेरिकेतील डॉ. ली झाह, डॉ. दिमित्री निकोलावास्की या तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनात ही कार्यशाळा होणार आहे. भारतातील पाचशे, तर विदेशातील ८० तज्ज्ञ युरोलॉजिस्ट या कार्यशाळेत सहभागी होणार आहेत.

'युरेथ्रोप्लास्टी'मुळे मूत्राशय आणि संबंधित विकारांच्या रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. काही मुलांना जन्मतःच मूत्रविसर्गाची जागा शिश्नाच्या खालील बाजूस असते. अशा रुग्णांसाठी अद्ययावत शस्त्रक्रिया उपलब्ध आहे. तसेच संभोग करण्यास पुरुषाचे लिंग जर अकार्यक्षम असेल, तर रुग्णाच्या शरीरात 'थ्री पीस पिनाईल प्रोस्थेसिस' हे उपकरण शस्त्रक्रियेद्वारे बसवले जाते. त्यानंतर रुग्णाच्या इच्छेनुसार अंडकोषाजवळ बसवलेले बटन दाबल्यानंतर पुरुषाचे लिंग ताठ होते आणि तो संभोग करण्यास सक्षम होऊ शकतो, असे डॉ. संजय कुलकर्णी यांनी नमूद केले.

पुरुषांचे लिंग जर ताठ झाल्यावर वाकत असेल, तर तेही ऑपरेशन करून सरळ करता येते. याला 'पेरोनीज डिसीज 'असे म्हणतात. ऑपरेशननंतर पेशंटची लघवी गळत



असेल, तर लघवीच्या मार्गाभोवती आर्टिफिशियल स्नायू बसवला जाऊ शकतो, जेणेकरून पेशंटचे लघवी गळणे थांबते, हेही ऑपरेशन युरोकूलमध्ये केले जाते. अपघातामध्ये किडनी व लघवीची पिशवी जोडणारी नळी तुटली व पोटात लघवी होऊ लागली तर त्या रुग्णाची नाजूक नळी परत जोडण्याचे ऑपरेशन रोबोटच्या साह्याने केले जाणार आहे. जगातील सर्वात अद्ययावत टेक्नॉलॉजी, रोबोटिक सर्जरी युरोकुलमधे मागील दीड वर्ष होत आहेत. ही शस्त्रक्रिया 'दा विंची रोबोट' वापरून केली जात आहे. या कार्यशाळेत विविध प्रकारच्या क्लिष्ट शस्त्रक्रिया रोबोटमार्फत केल्या जाणार आहेत, असे डॉ. संजय कुलकर्णी म्हणाले.


जलसंपदा विभाग,शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/मोप्र-१ दि.१८/१०/२०२३

प्रपत्र-३

महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता, कण्हेर कालवे विभाग क्र.२.

मु.पो. करवडी, ता.कराड, जि. सातारा, पिन ४१५ १०५ यांचे कार्यालय,

ई-मेलपत्ताः kcd2karawadigmail.com दूरध्वनी क्र. ७७७४०४१८५०, मो. ९८८१६०१४७४

## ई निविदा सूचना क्र.०६ सन २०२४-२५

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, कण्हेर कालवे विभाग क्र.२. करवडी (कराड), जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत, निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कण्हेर कालवे विभाग क्र.२. करवडी (कराड), यांनी राखून ठेवला आहे, अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | तारळी प्रकल्पांतर्गत इंदोली उ.सिं.यो. ता. कराड, जि. सातारा योजना कार्यान्वित करणेसाठी आवश्यक काम करणे. | ८०.१८ |
| २ | तारळी प्रकल्पांतर्गत बांबवडे उपसा सिंचन योजना टप्पा क्र.१ व २ व आवर्डे उपसा सिंचन योजना टप्पा क्र.१ पंपगृह पोहोच रस्ता काम करणे तसेच बांबवडे उपसा सिंचन योजना टप्पा क्र.२ भाग-१ उर्वरीत पंपगृह पोहोच रस्त्यांचे (सा.क्र.०/४२१ ते ०/९२०) बांधकाम करणे, ता. पाटण, जि. सातारा. | ९८.५८ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक ०५/१२/२०२४ ते दिनांक १२/१२/२०२४
ई-निविदा उघडणे :- दिनांक १६/१२/२०२४ रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे स्थळप्रत का.अ. यांना मान्य,

जा.क्र. ककावि-२/लेशा-२/ ३१८७/२०२४
कार्यकारी अभियंता, कण्हेर कालवे विभाग क्र. २,
करवडी (कराड) यांचे कार्यालय.
दि. २५/११/२०२४

सही/-
उपकार्यकारी अभियंता
कण्हेर कालवे विभाग क्र.२
करवडी (कराड)

विमाका-पुणे-जाहि-२६१-२०२४-२५


# जिल्हा परिषदेत जागतिक दिव्यांग दिन साजारा

**सातारा/प्रतिनिधीः**

जागतिक दिव्यांग दिन हा ३ डिसेंबर रोजी साजरा करण्यात येतो. याचे औचित्य समाज कल्याण विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या दिव्यांगांच्या अनुदानित, विनाअनुदानित शाळा, कार्यशाळा व अनाथ बौद्धिक अक्षम मुलांची बालगृह यामधील विद्यार्थ्यांनी शाळा स्तरावर आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धा मध्ये प्रथम क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व दिव्यांग अव्यंग विवाहास प्रोत्साहित करण्यासाठी आर्थिक सहाय्याच्या योजनेंतर्गत पात्र झालेल्या लाभार्थ्यांना २५ हजार रुपयांचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांच्या हस्ते देण्यात आले.

जिल्हा परिषदेमध्ये झालेल्या या कार्यक्रमास सदर कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास सिद, उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले, जिल्हा समाज कल्याण अधिकारी विद्यानंद चल्लावार, पशुसंवर्धन अधिकारी विनोद पवार, शिक्षणाधिकारी शबनम मुजावर उपस्थित होते.

प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करुन मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन म्हणाल्या, दिव्यांग मुलांना घडवण्यामध्ये मुलांच्या पालकांचा व शिक्षकांचा मोलाचा हातभार आहे. याच दिव्यांग मुलांमधून उद्याचे सुजान नागरिक, उच्च पदस्थ अधिकारी. डॉक्टर्स, इंजिनियर घडतील अशी आशा व्यक्त केली. दिव्यांग व्यक्तीनी सर्व क्षेत्रामध्ये प्राविण्य मिळवलेले आहेत. जिल्हा परिषद ही दिव्यांगाप्रती संवेदनशील असून दिव्यांगांच्या योजना राबवण्यासाठी आणि दिव्यांगांचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही सांगितले.




## फलटण नगरपरिषद,फलटण

ता. फलटण जि. सातारा.

कार्यालय क्रमांक :- ०२१६६-२२२३२५, ०२१६६-२२१७६७ टोल फ्री. १९१३
Website-www.panchganihillstation.com
E-mail id-panchganihsmc@gmail.com

## जाहीर नोटीस

फलटण नगरपरिषदेकडील स्वच्छ सर्वेक्षण विभागाकरिता आवश्यकतेनुसार जाहीर निविदा याद्वारे मागणी करण्यात येत आहेत. कामासंबंधी निविदा सूचना, निविदा फॉर्म, आर्थिक देकार नमुना, निविदा फॉर्म फी, बयाणा रक्कम, अंदाजपत्रकीय रक्कम, कामाचा कालावधी आपणास नगरपरिषदेच्या संबंधित विभागात दि. १२/१२/२०२४या अंतिम मुदतीपर्यंत कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील.

निविदा भरणेचा सादर करण्याचा कालावधी दि. ०५/१२/२०२४ ते १२/१२/२०२४ पुढील तक्त्यामध्ये अंतिम रकान्यात दर्शिविलेल्या तारखेपर्यंत (कार्यालयीन वेळ) असा राहील.

| अ.क्र. | नोटिसीचा प्रकार | कामाचे नाव | विभागाचे नाव | दरपत्रक/निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | जाहीर निविदा | स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत शहरातील शौचालय दुरुस्ती करणे | स्वच्छ सर्वेक्षण | दि.१२/१२/२०२४ |

जाहीर निविदेसाठीचे तांत्रिक व आर्थिक लिफाफे दि. १२/१२/२०२४ रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत मुख्याधिकारी, फलटण नगरपरिषद, फलटण यांचे नावे नगरपरिषद कार्यालयात सादर करावीत.

लिफाफ्यावर आस्थापनेचे नाव, पत्ता ठळक व स्पष्टपणे दिसेल या पद्धतीने नमुद करावा. मुदतीनंतर प्राप्त निविदांचा/दरांचा विचार केला जाणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

सही/-
मुख्याधिकारी
फलटण नगरपरिषद फलटण

# सातारा एसटी स्टँड परिसरातील बंद टपऱ्या हटवल्या

## कारवाईचा दणका; टपरी चालकांचे गाऱ्हाणे



**सातारा/प्रतिनिधी:**
सातारा शहरात बंद पडलेल्या टपऱ्या वाहतुकीच्या कोंडीचे कारण ठरत आहेत त्यामुळे त्या हटवण्याचा धडाका पालिकेने ठेवला आहे .सलग दुसऱ्या दिवशी सातारा पालिकेने सातारा मध्यवर्ती बस स्टँड परिसरातील तब्बल दहा टपऱ्या हटवल्या आहेत यावेळी टपरी चालक आणि नगरपालिका कर्मचारी यांच्यामध्ये वादावादीचे प्रसंग घडत आहेत तरीसुद्धा टपरी जप्त होणारच आशा भूमिकेमुळे टपरी चालकांचा विरोध मावळला आहे.

सातारा शहरांमध्ये मोकळ्या जागा ताब्यात घेऊन तेथे विनापरवाना टपरी टाकणारे फळकुट दादा आणि त्यांचा भाडेपट्टा याची आकडेवारी डोळे विस्फारून टाकणारी आहे या संदर्भात सातारा पालिकेकडे यापूर्वी वारंवार तक्रारी झाल्या होत्या त्यामुळे बंद टपऱ्यांच्या विरोधात सातारा पालिकेने मोहीम गतिमान केली आहे बुधवारी सकाळी अकरा वाजल्यापासून हुतात्मा उद्यान चौक ते करंजे ओढा व हुतात्मा उद्यान चौक ते सातारा स्टॅन्ड परिसर यादरम्यानच्या बंद पडलेल्या दहा टपऱ्या जप्त करण्यात आले आहेत तब्बल अडीच तास ही कारवाई सुरू होती तीन डंपर सातारा पालिकेचे १५ कर्मचारी असा लवाजमा घटनास्थळावर उपस्थित होता.

ज्या टपऱ्यांना केवळ बंद ठेवले जात आहेत अशा टपऱ्या उचलून जप्त करण्यात आल्या संबंधित मालकांना दहा हजार रुपयांचा दंड ठोठावला जाणार आहे बुधवारी सुद्धा टपरी चालक आणि पालिका कर्मचारी यांच्यामध्ये काही वादावादीचे प्रसंग घडले अमुक तमुक नेत्याचा नगरसेवकाचा अथवा एखाद्या वाड्याचा संदर्भ देऊन काही टपरी चालक पुढे येत होते मात्र तरी त्यांना न जुमानता सातारा पालिकेने आपली कारवाई पुढे सुरू ठेवली. येत्या दोन दिवसांमध्ये सातारा शहरातील सुमारे दीडशेहून अधिक बंद टपऱ्या उचलल्या जाणार असल्याची माहिती आहे.

# भाजपच्या गटनेतेपदी देवेंद्रजी फडणवीस

## साताऱ्यात जल्लोष आणि उत्साहाचे वातावरण



**सातारा/प्रतिनिधी:**
महाराष्ट्र राज्य भाजपा विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी माननीय श्री देवेंद्रजी फडणवीस यांची निवड झाल्याबद्दल साताऱ्यात कार्यकर्त्यांनी लाडू वाटून जल्लोष साजरा केला.

महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळात भारतीय जनता पार्टीचे एकशे बत्तीस उमेदवार निवडून आले, आणि आज विधिमंडळ पक्षाच्या गटनेचे पदी देवेंद्रजी फडणवीस यांची निवड झाली, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस, सर्व मित्र पक्ष आणि अपक्ष आमदार यांनी देवेंद्रजी फडणवीस यांना मुख्यमंत्री करण्याचे शिफारस पत्र राज्यपाल महोदयांना दिले, त्यामुळे उद्या देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील

प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखरभाऊ बावनकुळे, सातारा जिल्हाध्यक्ष धैर्यशीलदादा कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सातारा शहरात, भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी नागरिकांना लाडू वाटून जल्लोष केला, आनंदोत्सव साजरा केला, जुन्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचे काम आणि त्यांचा त्याग यामुळेच आजचे हे चांगले दिवस बघायला मिळत आहेत अशी प्रतिक्रिया यावेळी भारतीय जनता पार्टी शहराध्यक्ष विकास गोसावी यांनी दिली, भाजपाचे जेष्ठ कार्यकर्ते शरद जोशी गुरुजी, किशोरजी गोडबोले आणि प्रकाश काका शहाणे यांना लाडू बनवून त्यांचे तोंड गोड करण्यात आले आणि नंतर परिसरातील सर्व नागरिकांना भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी लाडू वाटले.

देवेंद्रजी फडणवीस यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळामध्ये, भाजपच्या जुन्या नव्या सगळ्या कार्यकर्त्यांना एकत्र घेऊन काम केले जाईल, तसेच सर्व मित्र पक्षांचा योग्य सन्मान राखून महाराष्ट्राच्या विकासासाठी भरघोस योगदान मिळेल, खासदार श्री छ उदयनराजे, आमदार श्री छ शिवेंद्रसिंहराजे यांच्या माध्यमातून सातारा शहराचा विकास होईल, अशी अपेक्षा यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केली

यावेळी भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यकारणी सदस्य सुवर्णाताई पाटील, प्रदेश कार्यकारणी सदस्य आणि माजी नगराध्यक्ष रंजनाताई रावत, उद्योजक आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष अमोलजी सणस, भटके विमुक्त आघाडी प्रदेश उपाध्यक्ष सदाशिव नाईक,जिल्ह्याचे पदाधिकारी, सातारा शहर पदाधिकारी, आघाड्या मोर्चाचे पदाधिकारी, बूथ प्रमुख, कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

# विट्यातील 'त्या' हॉस्पिटलमध्यील नर्सची आत्महत्या प्रेम प्रकरणातून

## चिठ्ठी सापडल्याने खळबळ



**विटा/प्रतिनिधी:**
सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील मोही येथील साक्षी गोरख पवार वय वर्षे २१ या तरुणीने मागील दोन तीन दिवसांपूर्वी विटा शहरातील एका नामांकित हॉस्पिटलमध्ये वरच्या दुसऱ्या मजल्यावर जेवण करायला जाते असे तिथे असणाऱ्या काही कांना दुपारी १२.३० च्या सुमारास सांगून गेली होती.


परंतु ती ३.३० झाल्याने ब्राचा वेळ साक्षी जेवण करून वरच्या मजल्यावरील रुम मधून परत न आल्याने काही तेथील जणांनी तुमचा दरवाजा वाजवला पण आतून कोणताच प्रतिसाद साक्षीने दिला नाही. शेवटी दरवाजा तोडून आत मध्ये बघितल्यावर काही कांना घटनास्थळी असलेल्यांना मोठा धक्काच बसला. त्या तरुणीने वरील पंख्याला दोरीने गळफास लावून आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले.

या संदर्भात तेथील डॉक्टरांनी या संदर्भात विटा पोलीसांना माहिती देत विटा पोलीसांनी घटनास्थळी धाव घेतली व सदर घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह विटा सांगली रोडवरील रुग्णवाहिकेतून ग्रामीण रुग्णालयात पीएम साठी हलवण्यात आला. मात्र साक्षीने ही टोकाची भूमिका का? घेतली तिने आत्महत्या का? केली याची माहिती मिळू शकली नव्हती.

साक्षी पवार हीने एक चिठ्ठी लिहून ठेवली होती की माझे एका मुलावर प्रेम होते. असे म्हणत बाकी मी गेल्यावर कोणालाही दोषी कोणी धरु नये असे उल्लेख या चिठ्ठीत लिहून ठेवले होते . त्या मुळे साक्षी पवार या तरुणीने ही आत्महत्या का केली याचा उलगडा झाल्याने शेवटी या गोष्टीला पूर्ण विराम मिळाला आहे. साक्षीनेच कोणाला दोशी धरू नये असे चिठ्ठीत लिहिलेल्याने आता पोलीस काय भुमिका या संदर्भात घेणार असा प्रश्न मात्र निर्माण झाला आहे.

# कराडच्या कृषी प्रदर्शनात येणार सर्वात उंच खिलार बैल

## प्रदर्शनात यंदा मुख्य आकर्षण ;बैलगाडी शौकिनांसाठी पर्वणी



सर्वात उंचीचा बैल उमराणीचा सोन्या

**कराड/प्रतिनिधी:**
शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या शेती उत्पन्न बाजार समिती, कराडच्या यशवंतराव चव्हाण कृषी, औद्योगिक, पशू – पक्षी प्रदर्शनाची तयारी पूर्ण झाली आहे. विना खांबावर उभारण्यात आलेल्या भव्य मंडपामध्ये विविध स्टॉल साकारण्याची हातघाई सुरू आहे. शासन कृषी विभागाने कृषी विभागाच्या मंडपात धुमाळवाडी ( ता. फलटण) या फळांच्या गावाची प्रतिकृती साकारली आहे. तर या प्रदर्शनातील मुख्य आकर्षण सर्वात उंच खिलार बैलाचे असणार आहे. उमराणीचा सोन्या नामक बैल प्रदर्शनात येणार असल्याने सर्वांनाच प्रदर्शनाची आतुरता लागली आहे. हा बैल पाहण्याची बैलगाडी शौकिनांना पर्वणी ठरणार आहे.

माजी सहकारमंत्री (कै.) विलासराव पाटील – उंडाळकर यांच्या संकल्पनेतून १८ वर्षापूर्वी शेती उत्पन्न बाजार समितीच्यावतीने यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक पशू पक्षी प्रदर्शन आकारास आले. गेल्या १८ वर्षापासून खंड न पडता हे प्रदर्शन भरवले जात आहे. यंदा प्रदर्शनाच्या वेळेत बदल होवूनही प्रदर्शनास शेतकरी, विक्रेते, महिला बचतगट, अवजारे व यंत्रे आदी विक्रेत्यांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे.

त्यामुळे प्रदर्शन स्थळावर उभारण्यात आलेले सर्व स्टॉल बुक झाले आहेत. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी रयत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ॲड. उदयसिंह पाटील – उंडाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सभापती प्रकाश पाटील, उपसभापती संभाजी काकडे, सर्व संचालक, कर्मचारी व डायनॅमिक इव्हेंटचे धीरज तिवारी तसेच त्यांची यंत्रणा अथक परिश्रम घेत आहेत.

प्रदर्शनात कृषी विभागाच्यावतीने धुमाळवाडी (ता. फलटण) या फळांच्या गावाची प्रतिकृती साकारली आहे. यातून शेतकऱ्यांनी शेतीपूरक फळबाग लागवडीकडे वळले पाहिजे, हा हेतू आहे. व शासनाच्या फळबाग लागवडीच्या योजनांची जागृती व्हावी, हा उद्देश ठेवून ही प्रतिकृती साकारली आहे. तर यंदा प्रदर्शनात सर्वात उंच बैलाचे मुख्य आकर्षण आहे.

उमराणीचा सोन्या नामक हा खिलार जातीचा बैल आहे. हा बैल खिल्लार व वळू क्षेत्रातील सर्वात उंचीचा व सर्वात जास्त लांबीचा जातीवंत वळू आहे. त्याची उंची ६.५ फूट व लांबी ९.५ फूट आहे. दरमहा त्याची कमाई अडीच लाख रुपयेपेक्षा जास्त आहे.

> उमराणीच्या सोन्या बैलाची आणखी काही वैशिष्ट्ये आहेत. ती अशी, त्याचे वय पाच वर्षे असून, तो शांत स्वभावाचा आहे. तो रोजच्या आहारात ३ डझन केळी खातो. ५ वेळा त्याला हिरवी वैरण तसेच एकदा ४० मक्याची कणसे लागतात. व दररोज तो आंघोळ करतो. यासह त्याच्यापासून नैसर्गिक रेतनाद्वारे पैदास होणाऱ्या वासरांना लाखो रुपयांची मागणी आहे.

# शेंदूरजणे गावातील गणूचे अपघाती निधन



**वाई/प्रतिनिधी:**
वाईच्या शहाबाग फाट्यावर दोन दुचाकींचा समोरा समोर झालेल्या भिषण अपघातात शेंदूरजणे ता.वाई येथील गणू ऊर्फ प्रतिक राजेंद्र जाधव या २० वर्षाच्या तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याने शेंदूरजणे गावासह वाई तालुक्यात शोककळा पसरली आहे.

गणू ऊर्फ प्रतिक हा मंगळवार दि. ३ रोजी रात्री सात वाजण्याच्या सुमारास दुचाकी वरुन वाईला जाण्यासाठी घरातुन बाहेर पडला . त्याची दुचाकी रात्री साडे सात वाजण्याच्या सुमारास शहाबाग फाट्यावरुन वाई कडे जाणार्या वळणावर आली असता वाई कडुन येणार्या दुचाकीची समोरा समोर धडक झाली हि धडक एवढी भिषण होती कि त्यात गणूचा जागीच मृत्यू झाला . गणू हा आई वडिलांना एकुलता एक मुलगा होता. त्याच्या या अपघाती निधना नंतर वाई तालुक्यातील गावा गावातील ग्रामस्थांन मधुन हळहळ व्यक्त केली जात आहे.

शेंदुरजणे ता.वाई जाधव वस्ती येथील रहिवाशी असलेले राजेंद्र जाधव वय ५० हे पत्नी उज्वला मुलगा प्रतिक मुलगी सानीका आणी प्राजक्ता असे राहण्यासाठी आहेत.आई वडिलांनी अतिशय हालाकिच्या परस्थिताचा सामना करत शेतीत काबाडकष्ट करत मुल शिकली पाहिजेत असा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेऊन प्रतिकला सातारा येथील नामांकित सावकार इस्टुटुट येथे कंप्युटर सायन्स या उच्च शिक्षणासाठी पाठवला होता. पण काळाने त्याच्यावर झडप घातल्याने आई वडिलांचे आणी प्रतिकचे उच्चशिक्षणाचे स्वप्न अखेर अधुरेच राहिले.

गणू हा गरिब कुटुंबातील तरुण शिक्षणात नावलौकिक प्राप्त विद्यार्थी होता तो प्रेमळ मायाळु असल्याने त्याचा मित्र परिवार मोठा होता .२० वर्षाच्या आणी खेळकर वयात असणार्या गणूच्या चांगल्या गुणांची पारख जिवंत असे पर्यंत कधीच कळली नाही . पण आज शेंदुरजणे गावच्या स्मशानभूमीत उपस्थित जनसमुदाय पाहुनी उपस्थितांना आश्चर्याचा धक्काच बसला.व तेथेच कळले कि गणू किती मोठा होता .

गणूचे अखेरचे अंतदर्शन घेण्यासाठी आणी अंतविधीस तरुण वर्गांचे थवेचे थवे मोठ्या संख्येने उपस्थित होते तर महिला वर्गाची संख्याही मोठी होती.त्यामळे स्मशानभूमी गर्दीने फुलुन गेली होती.या वेळी सामाजिक राजकीय शैक्षणिक सहकार क्षेत्रासह शेंदुरजणे ग्रामस्था बरोबर वाई सातारा जावली तालुक्यातील नागरीक सातारा येथील सावकार विद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते . एकुलता एक असणारा मुलगा गेल्याने जाधव कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# वडगाव हवेलीत कबड्डीच्या जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धांना प्रारंभ

## जिल्हा असोसिएशन व (कै.) शंकरराव जगताप यांच्या स्मरणार्थ स्पर्धा



वडगाव हवेली:जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धांचे उद्घाटन करताना राजन संदे व इतर मान्यवर तर दुसऱ्या छायाचित्रात कबड्डी स्पर्धेचा क्षण

**तांबवे/प्रतिनिधी:**
वडगाव हवेली (ता. कराड) येथे सातारा जिल्हा कबड्डी असोसिएशनच्यावतीने व (कै.) शंकरराव परशुराम जगताप यांच्या स्मरणार्थ सातारा जिल्हा कुमार गट (मुले) व कुमारी गट (मुली) जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धांना सुरुवात झाली. युवा नेते डॉ. सुधीर जगताप युवा प्रतिष्ठान व क्रांतिसिंह क्रिडा मंडळ, शिवनगर यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धा होणार आहेत.

माजी सरपंच राजन संदे यांच्या हस्ते व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत स्पर्धा सुरू झाल्या. यावेळी सातारा जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सचिव सुरेश पाटील, आंतरराष्ट्रीय पंच सायराबानू शेख, राष्ट्रीय प्रशिक्षक समीर थोरात, शशिकांत यादव, रमेश देशमुख, अरुण मदने, उमेश साबळे, संजय पवार, डॉ. सुधीर जगताप, कराड तालुका खरेदी – विक्री संघाचे संचालक उत्तमराव जगताप, आनंदराव जगताप, जे. जे. जगताप, कृष्णेचे माजी संचालक अशोकराव जगताप, माजी सरपंच राजन संदे, सुरेश गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य जयवंतराव जगताप, प्रशांत कटवटे, माजी उपसरपंच संतोष जगताप, प्रताप जगताप, संजय जगताप (मेजर), प्रमोद साळुंखे, सुहास जगताप, राष्ट्रीय खेळाडू ऐश्वर्या गोडसे,

पहिल्या दिवशी मुलींच्या कबड्डी स्पर्धा झाल्या. यावेळी जिल्ह्यातून १७ संघ सहभागी झाले आहेत. स्पर्धेतून जिंकलेले संघ राज्यस्तरीय स्पर्धेत निवडले जाणार आहेत. याकामी डॉ. सुधीर जगताप युवा प्रतिष्ठानचे कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

# राज्यस्तरीय अधिकाऱ्यांकडून साक्षरता वर्गांची होणार पाहणी

## शिक्षण संचालकांसह अधिकारी देणार अचानक भेट

**मसूर/प्रतिनिधीः-**
राज्यस्तरावरून साक्षरता वर्गाची पाहणी करण्यासाठी शिक्षण संचालनालयातील अधिकारी हे क्षेत्रीय कार्यालय, जिल्हा, तालुका आणि निवडक शाळांना चालू डिसेंबर महिन्यात भेटी देऊन आढावा घेणार आहेत. याबाबत योजना शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी आदेश निर्गमित केले आहेत.

त्या अनुषंगाने कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणीसाठी ऑनलाईन पद्धतीने बैठका घेतल्या जात आहे. या बैठकांमधून दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा, तालुका व शाळा स्तरावरील झालेल्या कार्यवाहीचा आढावा घेतला घेतला जाईल. केंद्र पुरस्कृत उल्लास नव–भारत साक्षरता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबतच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हा, तालुका व शाळा स्तरावर केलेली पूर्वतयारीचा, उल्लास मेळावा पूर्वतयारी व कार्यवाहीचा, तसेच शासनाच्या विविध योजनांचा आढावा घेण्यासाठी योजना संचालनालयातील अधिकारी जिल्हा, तालुका कार्यालयांना आणि निवडक शाळांना भेटी देणार आहेत.

भेटी दरम्यान संबंधित अधिकारी (योजना) कार्यालय, गट शिक्षणाधिकारी कार्यालय, शाळा तसेच उल्लास – नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत सुरू असलेले वर्ग यांना भेटी देवून असाक्षर व स्वयंसेवक यांच्याशी चर्चा करणार आहेत. तसेच शाळांमधून विविध शासकीय योजनांची सुरू असलेल्या अंमलबजावणीची पाहणी करून त्याची माहिती घेणार आहेत.विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संचालनालय स्तरावरून भेटी देण्यासाठी येणार्या अधिकार्यांसोबत जिल्ह्या कार्यालयातील वर्ग –१ किंवा वर्ग–२ दर्जाचे अधिकारी दौर्यात पूर्ण वेळ उपलब्ध असणार आहेत, असे प्रसिद्ध करण्यात आलेल्या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान शिक्षण सहसंचालक राजेश क्षीरसागर यांनी मंगळवारी राज्यातील सर्व विभागातील संचालक ते केंद्रप्रमुख या सर्व क्षेत्रीय स्तरावरील उल्लास कार्यक्रमाचा आढावा घेतला. प्रत्येक स्तरावर देण्यात आलेले नोंदणीचे उद्दिष्ट, असाक्षर आणि स्वयंसेवक जोडणी, साक्षरता वर्गांची अध्ययन–अध्यापन विषयक स्थिती, स्वयंसेवकांचे प्रशिक्षण, मागील वर्षीचे अपूर्ण कामकाज, जिल्हा व तालुका स्तरावरीय समित्यांच्या बैठका, उल्लास कार्यक्रमाच्या प्रचार प्रसारासाठी सार्वजनिक उत्सवातून व अन्यप्रकारे केलेले प्रयत्न, येत्या फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या परीक्षेची पूर्वतयारी, समाजातील अधिकाधिक घटकांचा या योजनेच्या यशस्वीतेसाठी मिळणारा सक्रिय सहभाग अशा विविध पैलूंचा यानिमित्ताने आढावा होणार आहे. शिक्षण संचालकांसह राज्यस्तरीय अधिकाऱ्यांकडून होणारे या झाडाझडतीमुळे जिल्हा व तालुकास्तरीय यंत्रणा सतर्क झाल्या आहेत.

# अखेर महावितरणने बसवला नवीन ट्रांसफार्मर

## दैनिक प्रितीसंगमच्या वृत्ताची महावितरणकडून दखल

**चाफळ/प्रतिनिधी:**
कळंत्रेवाडी, ता.कराड येथील उत्तरमांड नदीकाठालगत असलेल्या विद्युत डीपीचा ट्रांसफार्मर जवळपास सहा दिवसांपूर्वी जळाला होता. त्यामुळे लागण केलेल्या ऊस पिकास तसेच टोकणी केलेल्या गव्हास पाणी देता येत नसल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त होते.

सध्या सुरू हंगामातील ऊसाची लागण तसेच खरीप हंगामातील गव्हाची टोकणी सुरू असून शेतकऱ्यांना पाण्याची नितांत गरज असताना डीपीचा ट्रांसफार्मर जळाल्यामुळे ऊसाचे तसेच गव्हाचे कधीही भरून न येणारे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. दरम्यान,

याबाबतचे सचित्र वृत्त दैनिक प्रितीसंगमने प्रसिद्ध करताच उंब्रज महावितरणने तात्काळ सूत्रे हलवीत नवीन ट्रान्सफॉर्मर बसवल्यामुळे शेतकऱ्यांचा जीव अखेर भांड्यात पडला असून दैनिक प्रितीसंगमवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



कळंत्रेवाडी:नवीन ट्रान्सफॉर्मर बसवताना महावितरणचे कर्मचारी(छाया–रघुनाथ थोरात)

> **दैनिक प्रितीसंगम..शेतकऱ्यांचा कैवारी**
>
> डीपीचा ट्रांसफार्मर अचानकपणे जळल्यामुळे आमचे कधीही न भरून येणारे आर्थिक नुकसान होणार होते. दरम्यान,याबाबत दैनिक प्रितीसंगमने आवाज उठवल्यानंतर महावितरणने तात्काळ नवीन ट्रांसफार्मर बसवला त्याबद्दल दैनिक प्रितीसंगमचे मनःपूर्वक आभार...!
>
> – सर्व शेतकरी (कळंत्रेवाडी)


॥ भावपुर्ण श्रध्दांजली ॥



कै. नारायण बापूराव कोकीळ
यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले

शोकाकुल

सारंग कोकीळ, संतोष कोकीळ,शेखर कोकीळ,किशोर कोरे,नंदकुमार कोरे, प्रदिप कोरे,अमोल कोकीळ,भैय्या रिसवडे,विनोद बाबर,विकास देशमुखे, सोमनाथ पैलवान,आनंदा दिवटे, हेमंत बाबर,जेष्ठ पत्रकार शिराज शिकलगार,

समस्त कोकीळ परिवार
(आडवी पेठ विटा)


# पोलीस क्रीडा स्पर्धेतून ऑलम्पिक दर्जाचे खेळाडू तयार होतील

## विभागीय आयुक्त,डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार




**कोल्हापूर/प्रतिनिधी:**
पोलीस विभागामार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या क्रीडा स्पर्धेतून ऑलम्पिक दर्जाचे खेळाडू तयार होतील असा विश्वास पुणे विभागाचे आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांनी ५० व्या कोल्हापूर परिक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पर्धेच्या समारोपीय समारंभावेळी बोलताना व्यक्त केला. त्यांच्या हस्ते या स्पर्धेतील विजेत्या खेळाडू व संघांना बक्षिस वितरित करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, प्रत्येकाच्या जीवनात खेळाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आपली मानसिक व शारिरिक तयारी ठेवण्यासाठी कोणत्याही क्रीडा प्रकाराची आवड असणे गरजेचे आहे. कोल्हापूर सारख्या जिल्ह्यात क्रीडा प्रकारांना सर्वोच्च स्थान असल्याने अजूनच या स्पर्धेला रंगत प्राप्त झाली. खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या स्पर्धेतून अनेक चांगले खेळाडू पुढे येतील. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्यासाठी पोलीस विभागातील खेळाडूंनी अजून आपली कामगिरीमध्ये सुधारणा करावी असेही ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाला विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र सुनिल फुलारी, प्रभारी जिल्हाधिकारी संजय शिंदे, पोलीस अधीक्षक कोल्हापूर महेंद्र पंडित, पोलीस आयुक्त सोलापूर शहर एम.राजकुमार, पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण पंकज देशमुख, पोलीस अधीक्षक सांगली संदिप घुगे, पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक सातारा समीर शेख, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. उपस्थित होते.

कोल्हापूर परिक्षेत्रातील ५० व्या पोलीस क्रीडा स्पर्धाला शुक्रवार दि. २९ नोव्हेंबर रोजी पोलीस मैदानावर सुरुवात झाली. त्याचे उद्घाटन पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित यांच्या हस्ते झाले होते. या स्पर्धेत कोल्हापूरसह, सांगली, सातारा, सोलापूर शहर, सोलापूर ग्रामीण आणि पुणे ग्रामीण येथून एकूण १९ संघ एकल व सांघिक गटात सहभागी झाले होते. १,२०० हून अधिक पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी जवळपास १९ विविध क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेतला. यात जनरल चॅम्पियनशीप चषक सातारा व कोल्हापूर पुरूष गटाला विभागून मिळाला तर महिलांमध्ये कोल्हापूर जिल्ह्याने बाजी मारत जनरल चॅम्पियनशीप चषकाला गवसणी घातली. पोलीस विभागातील खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या स्पर्धेचा उद्देश होता. या स्पर्धेत चांगली कामगिरी करणाऱ्या संघांना राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये भाग घेता येणार आहे. पुढिल वर्षीची स्पर्धा पुणे ग्रामीण यांच्याकडे आयोजित केली जाणार आहे. याची घोषणा व ध्वज हस्तांतरण यावेळी करण्यात आले.

व्हॉलीबॉल, हँडबॉल, कबड्डी, खो–खो, फुटबॉल, हॉकी, बास्केटबॉल, जलतरण, थलेटिक्स, क्रॉस कंट्री, मॅरेथॉन, कुस्ती, ज्युडो, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग अशा विविध खेळांचे सामने या स्पर्धेत झाले. यावेळी पहिल्यांदाच वुशू सारख्या खेळाचा समावेश करण्यात आला होता. कार्यक्रमाचे आध्यक्ष विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र सुनिल फुलारी यांनी या स्पर्धेच्या चांगल्या आयोजनासाठी कोल्हापूर पोलीस अधीक्षक व त्यांच्या टीमचे अभिनंदन केले. ते म्हणाले, पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी लोकसभा, विधानसभा तसेच इतर महत्त्वाच्या वक्तींचे दौरे विभागातील महत्त्वाचे सन उत्सव अतिशय चांगल्या प्रकारे पार पाडले. त्यांचा थकवा या स्पर्धेतून नक्कीच दूर झाला असेल. तसेच त्यांना कामाच्या दैनंदिन परिस्थितीतून एक वेगळे वातावरण देण्याचा प्रयत्न यातून केला. या स्पर्धेतून मिळालेली ऊर्जा चांगल्या कामी खर्ची घालावी तसेच नियंत्रित गुन्हेगारी कायम राहिल यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करावेत असे आवाहनही त्यांनी यावेळी मनोगतामधून व्यक्त केले.

प्रास्तविकात पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी पोलीसांच्या समोरील विविध आव्हाणे व बदलते कामाचे स्वरूप यातून त्यांना चांगले वातावरण निर्माण व्हावे व त्यांना सांघिक भावना निर्माण व्हावी यासाठी अशा स्पर्धांची गरज असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अपर पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे पाटील यांनी मानले तर सुत्रसंचलन मोनिका जाजू यांनी केले. कार्यक्रमात वारणा व्हॅली स्कूल, तळसंदे येथील मुलांनी मल्लखांब क्रीडा प्रकारातील रोमहर्षक प्रात्यक्षिके सादर केली.